दैनिक
www. sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ९७ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.४ फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# देवेंद्र फडणवीस सरकारचा महत्त्वाचा निर्णय:सर्वच शासकीय कार्यालयांमध्ये मराठी बोलणे अनिवार्य



**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यात देवेंद्र फडणवीस सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी आता सर्वच शासकीय, निमशासकीय व महापालिका कार्यालयांमध्ये मराठी बोलणे अनिवार्य असणार आहे. तसेच या कार्यालयात मराठी भाषेत बोलण्याबद्दल दर्शनी भागात फलक लावावा लागणार आहे. शासकीय कार्यालयातील संगणकावरील कळफलक सुद्धा मराठी भाषेतच असणार आहेत. इतकेच नव्हे तर मराठी भाषेचा वापर करण्यास नकार देणाऱ्यांवर देखील शिस्तभंगाची कारवाई केली जाणार असल्यासंदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार व विकास होण्याच्या अनुषंगाने केवळ शिक्षणाचेच नव्हे तर सर्व लोकव्यवहाराचे होता होईल तेवढे मराठीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी संवाद, संपर्क आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे, ही बाब लक्षात घेऊन मराठी भाषा धोरणामध्ये व्यवहारक्षेत्र निहाय शिफारसी अंतर्भूत आहेत. मराठी भाषेस येत्या २५ वर्षांमध्ये ज्ञानभाषा व रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित करणे हे शासनाच्या सदर धोरणाचे अन्य उद्दिष्टांसह प्रमुख उद्दिष्ट आहे.केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर आता राज्य सरकारकडून देखील मराठी भाषेला अधिक सक्षमपणे व प्रभावीपणे रुजवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसत आहे. तसेच आता या धोरणात शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, संगणक शिक्षण, विधी व न्याय व्यवहार, वित्त व उद्योजगत, प्रसारमाध्यमे, प्रशासनात मराठी भाषेचा वापर इत्यादी व्यवहारक्षेत्रनिहाय सविस्तर शिफारशी प्रस्तावित आहेत. त्यानुसार, महाराष्ट्र राज्यात शासकीय खरेदी व शासकीय अनुदानातून खरेदी केल्या जाणाऱ्या संगणक कळफलकांवरील छापील अक्षर कळमुद्रा रोमन लिपीबरोबरच मराठी देवनागरी लिपीत असणे अनिवार्य आहे.सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, शासन महामंडळे, शासन अनुदानित कार्यालयांमध्ये येणाऱ्या सर्वांनीच मराठी भाषेमधून संभाषण करणे अनिवार्य असेल. तसेच मराठी भाषेचा वापर व मराठीमध्ये संभाषण करण्याबाबत कार्यालयांमध्ये दर्शनी भागात फलक लावणेही अनिवार्य असेल. याबाबतची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल, असेही या आदेशात म्हटले आहे.शासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेत संभाषण न करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्या विरोधात कार्यालय प्रमुख वा विभागप्रमुखांडे तक्रार करता येणार आहे. तसेच यात अधिकारी किंवा कर्मचारी दोषी आढळून आल्यास त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही केली जाणार आहे.

# शिर्डी साई संस्थानातील कर्मचाऱ्यांचे दुहेरी हत्याकांड

**शिर्डी । प्रतिनिधी**

राज्यात वाढती गुन्हेगारी कमी करणे हे सरकारसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. दररोज राज्यातील विविध भागामध्ये गुन्हे घडत असल्याने कायदा सुव्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण झलेले आहेत. वाढत्या गुन्हेगारीवर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस कठोर पाऊले उचलणार असे बोलले जात असतानाच, आता महाराष्ट्रातील प्रसिद्ध अशा शिर्डीमध्ये दुहेरी हत्याकांड घडल्याची माहिती समोर आली आहे.

एकाच दिवशी तीन वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या घटनांमध्ये दोन जणांचा मृत्यू झाला आहे, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ज्या दोन जणांचा मृत्यू झाला आहे, ते दोघेही शिर्डी साई संस्थानातील कर्मचारी असल्याची माहिती समोर आली आहे. या दोन्ही कर्मचाऱ्यांवर धारदार शस्त्राने वार करून त्यांची हत्या करण्यात आली आहे. या घटनेनंतर शिर्डीत भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (ता.०३ फेब्रुवारी) पहाटे ४ ते ५.३० वाजताच्या



दरम्यान विमानतळ रोडवर या तिन्ही घटना घडलेल्या आहेत. चोरीच्या उद्देशाने या घटना घडल्या असल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली आहे. दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी चोरीच्या उद्देशाने तिघांना वेगवेगळ्या वेळेत अडवून त्यांच्याकडील रक्कम हिसकावून घेतली.

हे हल्लेखोर इतक्यावरच थांबले नाही तर त्यांनी निरपराध नागरिकांवर चाकूने असंख्य वार केले. यामध्ये दोघांचा जागेवरच मृत्यू झाला. तर एक ग्रामस्थ गंभीर जखमी झाला. ही हल्ल्याची घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. सुभाष घोडे आणि नितीन शेजुळ अशी या घटनेत मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. तर, कृष्णा देहरकर नावाचा तरुण गंभीर जखमी झाला आहे. साई संस्थानचे दोघे कर्मचारी आणि शिर्डीतील एका तरुणावर ड्युटीला येताना प्राणघातक हल्ला करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.धक्कादायक बाब म्हणजे, या घटना घडल्यानंतर, घटनेत दोघांचा जीव गेल्यानंतरही पोलिसांनी याकडे गांभीर्याने पाहिले नाही. पोलिसांनी या घटना अपघात असल्याचे सांगितल्याने मृतांच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त केला आहे. जोपर्यंत आरोपींना अटक करण्यात येत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याची भूमिका मृतक घोडे याच्या नातेवाईकांनी घेतली आहे.तर पोलिसांना मर्डर आणि अपघातातील फरक कळत नसेल, तर अशा अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्याकडून सांगण्यात आले आहे. या घटनेनंतर नागरिकांचा संताप पाहून पोलिसांनी आरोपींना शोधण्याची मोहीम हाती घेतली आहे.

# ग्रंथोत्सवामुळे वाचन चळवळीला मिळते प्रोत्साहन–आमदार सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ग्रंथ मानवी जीवनात मार्गदर्शक ठरतात. मी पहिल्यांदा आमदार झाल्यानंतर वाचनालयांच्या स्थापनेसाठी आग्रही होतो. चंद्रपूर, बल्लारपूर, मुल व पोंभूर्णा येथे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालये स्थापन केली. या वाचनालयांचा उपयोग अनेक विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांसाठी केला असून, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी यश मिळवले आहे. आजच्या काळात वाचन कमी होत असताना ग्रंथोत्सवासारखे उपक्रम अधिक महत्त्वाचे ठरतात. अशा कार्यक्रमांमुळे वाचन चळवळीला प्रोत्साहन मिळते, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

आमदार मुनगंटीवार यांनी ग्रंथोत्सवाला भेट दिली. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी, डॉ. शाम मोहोरकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी रत्नाकर नलावडे, अनिल बोरगमवार आदी उपस्थित होते. ते म्हणाले, व्हॉट्सॲप युनिव्हर्सिटीच्या युगात ग्रंथवाचन, ग्रंथखरेदी व प्रकाशन यांची गोडी कमी होत आहे. यावर उपाय म्हणून ग्रंथोत्सव हे एक प्रभावी माध्यम ठरू शकते.आमदार मुनगंटीवार पुढे म्हणाले, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणांतर्गत



चंद्रपूर जिल्ह्यात ग्रंथोत्सव, ग्रंथप्रदर्शन व विक्रीचे आयोजन होत आहे. समाजावर दीर्घकालीन चांगले परिणाम करणाऱ्या विषयांत वाचन आणि ग्रंथप्रोत्साहन यांचाही समावेश आहे. मी अर्थमंत्री असताना मुंबईतील एशियाटिक लायब्ररीला १५ कोटी रुपयांचा निधी दिला. चंद्रपूर जिल्हा ग्रंथालयाच्या उभारणीसाठी १४ कोटी ९० लाख रुपये मंजूर करण्यात आले. हे ग्रंथालय विदर्भातील उत्तम ग्रंथालयांपैकी एक ठरेल, जिथे विचारमंथन होईल. यापुढे ग्रंथोत्सवाला मोठे रूप देण्याची आवश्यकता असल्याचे सांगत आमदार मुनगंटीवार म्हणाले, चांदा क्लब ग्राउंड येथे भव्य ग्रंथोत्सव झाल्यास हजारो विद्यार्थी सहभागी होतील. पुस्तकांचे शेकडो दालने लागतील आणि लाखो पुस्तके विकली जातील. अशा वेळी खऱ्या अर्थाने ग्रंथोत्सवाचे उद्दिष्ट साध्य होईल. तत्पूर्वी, ग्रंथोत्सवाचे उद्घाटन ग्रंथालय चळवळीचे प्रणेते डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले.

# पुण्यात GBS चा धुमाकूळ परिस्थिती हाताबाहेर?

**शिरूर । रमेश बनसोडे**

पुणे शहरात सध्या गुइलेन–बॅरी सिंड्रोम (GBS) या आजाराच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. पुण्यासह आसपासच्या गावातही या आजाराचे रुग्ण आढळून येत असल्यामुळे पुणेकरांची चिंता वाढली आहे.

रविवारी पुण्यात GBS चे तीन नवे रुग्ण आढळले असून, त्यामुळे एकूण रुग्णांची संख्या १५८ वर पोहोचली आहे. यातील २१ रुग्णांची प्रकृती गंभीर असून ते व्हेंटिलेटरवर उपचार घेत आहेत.

दुषित पाण्यामुळे रुग्णांची संख्या वाढत असल्याची शंका प्रशासनाला आहे. या आजाराचे मूळ शोधण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. यासाठी सिहगड परिसरातील पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. मात्र, अद्याप रुग्ण वाढीचे कारण समजू शकलेले नाही.



पुण्यातील एकूण ऋइड रुग्णांपैकी ३१ रुग्ण पुणे महापालिका क्षेत्रातील आहेत, तर ८३ रुग्ण सिहंगड रोड, किरकिटवाडी, नांदोशीसह आसपासच्या काही गावांमधील आहेत. १८ रुग्ण पिंपरी–चिंचवडमधील आणि १८ रुग्ण पुणे ग्रामीण भागातील आहेत, तर आठ रुग्ण इतर जिल्ह्यातील आहेत.

आतापर्यंत ऋइड मुळे पाच रुग्णांचा मृत्यू झाला असून ३८ रुग्णांना उपचारानंतर रुग्णालयातून सोडण्यात आले आहे.

# सुपा व पारनेर औद्योगिक वसाहतीतील अतिक्रमणे तातडीने काढण्याचे आदेश - पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यासाठी सुपा व पारनेर औद्योगिक वसाहत क्षेत्रातील अतिक्रमणे तातडीने हटवण्याचे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पारनेर औद्योगिक वसाहतीच्या प्रश्नांबाबत आयोजित बैठकीत पालकमंत्री बोलत होते. या वेळी आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, पारनेरचे उपविभागीय अधिकारी श्रीकांत चिंचकर, तहसीलदार गायत्री सौंदणे



आदी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील यांनी निर्देश दिले की, सुपा व अहिल्यानगर औद्योगिक वसाहतीच्या हद्दीत अतिक्रमण तसेच अनधिकृत टपऱ्यांविरोधात येत्या १५ दिवसांत ठोस कारवाई करावी आणि संपूर्ण परिसर अतिक्रमणमुक्त करावा.तसेच, प्रदूषण नियंत्रण महामंडळ, कामगार विभाग व औद्योगिक विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त तपासणी करून प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची माहिती संकलित करावी आणि कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही त्यांनी सांगितले. औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांच्या प्रमुखांसोबत बैठकीचे आयोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.या बैठकीस संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# भंडारा जिल्ह्यासाठी भरीव निधी देण्याचा प्रयत्न–उपमुख्यमंत्री पवार

## सौरऊर्जा, पर्यटन आणि तीर्थक्षेत्र विकासासाठी स्वतंत्र निधी देण्याचा निर्णय

**भंडारा । प्रतिनिधी**

जिल्हा नियोजन समितीद्वारे जिल्ह्यातील विकास कामांना निधी देण्यात येतो .गतवर्षीपेक्षा भंडारा जिल्ह्याला २०२५ – २६ यावर्षासाठी भरीव निधी देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील असे आश्वस्त उद्गार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे काढले.ऑनलाईन बैठकीद्वारे भंडारा जिल्ह्याचा जिल्हा नियोजन समितीचा आढावा त्यांनी घेतला.

यावेळी पालकमंत्री संजय सावकारे , वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल हे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते .तर जिल्हाधिकारी कार्यालयातून जिल्हाधिकारी डॉ.संजय



कोलते, मुख्य कार्यकारी अधिकारी, समीर कुर्तकोटी व सर्व विभाग प्रमुख सभागृह परिषद कक्षात उपस्थित होते.यावेळी बोलताना पवार म्हणाले की शासकीय इमारती इमारतींचे विद्युतीकरण हे सौरऊर्जेद्वारे करण्यात यावे .या कामाला प्राधान्य देण्यात यावे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग असेल किंवा सर्व शासकीय कार्यालय विभाग प्रमुख असतील यांनी सौर ऊर्जेवर विद्युतीकरण प्रक्रियेसाठी पुढाकार घ्यावा.भंडारा जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी व तीर्थक्षेत्र विकासासाठी देखील यंत्रणांनी या दृष्टीने विचार करून विकास आराखडा सादर करावा .जल पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी वेगळा निधी देण्याचे त्यांनी आश्वस्त केले.यावेळी ऑनलाइन पद्धतीने नागपूर विभागीय अप्पर आयुक्त कार्यालयातून डॉ.माधवी खोडे–चवरे उपस्थित होत्या.

# स्थानिक कार्यकर्त्यांना संधी, ग्रामसभेत मिळणार विशेष निमंत्रण:राज्यभरात सुमारे १ लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची होणार नियुक्ती

**मुंबई**–महाराष्ट्रात आता प्रत्येक पाचशे मतदारांमागे कार्यकारी अधिकारी राहणार असून, याप्रमाणे राज्यभरात सुमारे एक लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी जिल्ह्यात नियुक्त करणार असून प्रत्येक ठिकाणी ३३ टक्के महिलांची नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती विशेष कार्यकारी अधिकारी राज्य निवड समितीचे अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. महाराष्ट्र सरकारने आज विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्ती संदर्भातील सुधारित शासन आदेश जारी केला. त्यानुसार राज्य स्तरावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे या समितीचे अध्यक्ष आहेत. जिल्हा पातळीवर पालकमंत्री सदस्य व जिल्हाधिकारी सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत. आजच्या सुधारित जीआरमुळे आतापर्यंत पदावर असलेल्या विशेष कार्यकारी अधिकारीचे पद तात्काळ प्रभावाने नाहीसे होणार आहे.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले की, हे विशेष कार्यकारी अधिकारी शोभेचे पद नसणार नाही. तर त्यांना १३ ते १४ विशेष अधिकार देण्यात येणार आहेत. आतापर्यंत प्रत्येक १००० मतदारांमागे एक विशेष कार्यकारी अधिकारी असायचा मात्र आता राज्य सरकारने नव जीआर काढून प्रत्येक ५०० मतदारांमागे एक विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्याचा निर्णय घेतल्याने मोठ्या संख्येने विशेष कार्यकारी अधिकारी राज्यात नेमले जाणार आहे. लवकरच प्रत्येक जिल्ह्यातल्या निवड समितीच्या माध्यमातून नव्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची निवड व नेमणूक केली जाणार.अनेक महत्त्वाच्या विषयांमध्ये, विकासाच्या विषयांमध्ये, दक्षता समितीमध्ये विशेष कार्यकारी अधिकारी काम करणार असून, विशेष कार्यकारी अधिकारी शासनाच्या विविध योजनांमध्ये सहकारी म्हणून काम करणार आहे. प्रशासन आणि पोलिसांशी समन्वय साधणार आहे. या पदावरील नियुक्तीसाठी किमान दहावी उत्तीर्ण असावे लागेल.वय २५ वर्षांपेक्षा जास्त आणि ६५पेक्षा कमी असावे.शासकीय योजनांसाठी ज्या काही प्रमाणपत्र लागतात ते प्रमाणपत्र देण्याचा अधिकार या विशेष कार्यकारी अधिकारी यांना असेल तसेच विविध समित्यांमध्ये त्यांना स्थान मिळेल. सरकारच्या विविध कामांवर लक्ष घालण्याचे अधिकार त्यांना असेल.सुधारित निर्णय सरकारने केला असून, आता सरकारी सेवा व सुविधांसाठी लागणारी कागदपत्रे सुलभपणे मिळतील. जेणेकरून सरकार आपल्या दारी असल्याचे दिसून येईल. विशेष कार्यकारी अधिकारी नेमताना महिला वर्गाला महत्त्वपूर्ण स्थान देण्यात आले आहे. ३३ टक्के महिलांची नियुक्ती करण्यात येईल. तसेच राज्य सरकारच्या महत्वाच्या पाच पुरस्कार विजेत्यांनाही या पदावर नेमले जाणार आहे. या पदावरील व्यक्तीचा कालावधी पाच वर्षांचा असेल. तसेच ग्रामसभेत या अधिकाऱ्यांना विशेष निमंत्रित केले जाईल.

# मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३५ व्या अधिवेशनाने प्राध्यापकांना काय दिले ?

**भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुकास्थळी १७ व १८ जानेवारीला मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशन थाटात संपन्न झाले. समर्थ महाविद्यालयात संपन्न झालेल्या या अधिवेशनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या दोन्ही विद्यापीठातील मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांनी भरभरून प्रतिसाद दिला. प्राध्यापकांच्या उपस्थितीने गर्दीचा उच्चांक मोडला. हे अधिवेशन आटोपून घरी परतत असताना या अधिवेशनात प्राध्यापकांना काय मिळाले? त्यांना नेमके काय वाटते? हे या प्रतिक्रियांच्या माध्यमातून जाणून घेण्याचा अल्पसा प्रयत्न मराठीतील अग्रगण्य दैनिक सह्याद्रीचा राखणदार ने केला आहे. या उपक्रमात दोन्ही विद्यापीठातील अनेक प्राध्यापकांनी आपल्या प्रतिक्रिया पाठविल्या आहेत. त्यातील काही निवडक प्रतिक्रिया वाचकांसाठी देत आहोत.(भाग अंतिम)**







यावर्षीचे मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन आगळे-वेगळे राहिले. यावर्षी झालेले 'मराठी भाषा विद्यापीठ' व मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा यामुळे अधिवेशनाचा आनंद द्विगुणित झाला. मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरचे कुलगुरू डॉ.अविनाश आवलगावकर, बोली अभ्यासक हरिचंद्र बोरकर तसेच सहसंचालक डॉ.संतोष चव्हाण 'मराठी' विषयाचे असल्याने सर्व अधिवेशन खऱ्या अर्थाने मराठीमय झाले होते. उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद येथील विशेष अतिथी डॉ. नम्रता बागडे यांनी अधिवेशनामध्ये ज्ञानाची व विचाराची भर घातली. या द्विदिवसीय अधिवेशनामध्ये 'नवे शैक्षणिक धोरण : दशा आणि दिशा, 'अभिजात मराठी भाषा : वास्तव आणि भविष्य', 'साहित्य संमेलन : चिंता व चिंतन' या विषयावर झालेले परिसंवाद तसेच खुले अधिवेशन मौलिक ठरले. मराठी प्राध्यापक परिषदेमध्ये यावर्षी पासून सुरू झालेला 'जीवनगौरव' पुरस्कार आकर्षणाचा विषय तसेच पुढील पिढीकरिता प्रेरणादायी ठरला. समर्थ महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली नेमलेल्या समितीने केलेले नियोजन, नोंदणी विभाग, भोजनव्यवस्था वाखणण्याजोगी होती. रात्रीची मराठी प्राध्यापकांची 'संगीत रजनी' सर्वांच्या स्मरणात राहण्यासारखी झाली. सर्वजण आपले वय विसरून कलेचा येथेच्छ आनंद लुटत होते. मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशनाध्यक्ष मा. डॉ. अजय चिकाटे यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड यांनी मराठी प्राध्यापक परिषदेची वर्षानुवर्ष चालत आलेली परंपरा अखंडीत व अबाधित ठेवली. प्राध्यापक परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. हिराजी बनपुरकर, सचिव डॉ राजेंद्र वाटाणे, पूर्वाध्यक्ष डॉ. राजेंद्र नाईकवाडे, संयोजक डॉ. बंडू चौधरी यांनी प्राध्यापक परिषदेच्या यशस्वीतेकरिता अथक प्रयत्न केले. ज्येष्ठ प्राध्यापकगण डॉ. श्याम मोहरकर, डॉ. विद्याधर बनसोड, डॉ. राजेंद्र वाटाणे, डॉ. गुरूदास पाखमोडे, डॉ. यशवंत घुमे,कवी डॉ. धनराज खानोरकर, डॉ. संजय लाटेलवार, डॉ. संतोष देठे तसेच मित्रपरिवार डॉ. सुधाकर भुयार, प्रा. योगीराज नगराळे, प्रा. राम वासेकर यांच्या समवेत दोन दिवस राहता आले. त्याचीच फलश्रुती यावर्षीची मराठी प्राध्यापक परिषद अधिक आनंदमय ठरली. शेवटी वारकऱ्याच्या वारीप्रमाणे ही परंपरा अखंडित राहो, ही शुभकामना!

**डॉ.पदमाकर वानखडे,नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रह्मपुरी जि. चंद्रपूर**

मराठी प्राध्यापक परिषदेचे अधिवेशन भंडारा जिल्ह्यातील लाखनी येथे बऱ्याच वर्षांनी घेण्याचे ठरले, तत्पूर्वी डॉ.गुरुप्रसाद पाखमोडे हे समर्थ महाविद्यालय येथे प्राचार्य पदी असताना, त्यावेळी अधिवेशन संपन्न झाले होते. दोन दिवसीय अधिवेशन पार पाडण्याकरता, समर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगंबर कापसे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन समितीची आढावा बैठक घेण्यात आली. ह्या बैठकीत डॉ.संजयकुमार निंबेकर, डॉ. बंडू चौधरी, डॉ. अजिंक्य भांडारकर, डॉ. रूपाली खेडीकर, डॉ. नीलिमा कापसे, डॉ. जगदीश भैसारे, डॉ. अरविंद कटरे, डॉ. रामलाल चौधरी यांसह अनेक प्राध्यापकांनी उपस्थित राहून अधिवेशनाचा आढावा व नियोजन करून आपले कामे व जबाबदाऱ्या वाटून घेतल्या. महाविद्यालयातील सुंदर व सुबक अशा रांगोळी, छायाचित्रे बॅनर, बक्षीसे , उत्तमपणे राहण्याची सुख सुविधा, अधिवेशनातील भोजन व्यवस्था, चहापाण्याची व्यवस्था तसेच साऊंड सिस्टिमची सुव्यवस्था अशा सर्वच जबाबदाऱ्या देण्यात आल्या, एनसीसीचे प्रशिक्षणार्थी शिस्तबद्ध व नियमबद्ध पद्धतीने आपल्या वेशभूषेत राहुन घेणारा प्रमुख अतिथी व मान्यवरांच्या स्वागतासाठी सुसज्ज झाले होते. विशेषतः संगीत विषय असणाऱ्या विद्यार्थिनी व प्राध्यापिका त्यांनीही आपल्या सुंदर सुस्वाराने, गर्जा महाराष्ट्र माझा असे सुंदर गीत गायले आणि मराठी भाषेचा गौरव पर गीत गाऊन सर्व येणाऱ्या अतिथींना मंत्रमुग्ध केले, समर्थ महाविद्यालय येथील स्थापनेपासून ते आतापर्यंत नियमबद्ध व शिस्तबद्ध वातावरणाचा अनुभव ह्या अधिवेशनात पाहायला मिळाला. डॉ.गुरुप्रसाद पाखमोडे, डॉ. सत्यवान मेश्राम, मराठी प्राध्यापक परिषदेचे प्रभारी नेतृत्व असणारे डॉ. गणेश मोहोड, डॉ. राजेंद्र वाटाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनात ३५ व्या अधिवेशनाची रूपरेषा व नियोजन करण्यात आले. अधिवेशनाच्या उदघाटन सोहळ्यात, डॉ.दिगंबर कापसे, डॉ. राजेंद्र नाईकवाडे, डॉ.अविनाश आवलगावकर, डॉ. गणेश मोहोड, डॉ. गुरुप्रसाद पाखमोडे, डॉ. नम्रता बागडे, उच्च शिक्षण विभाग नागपूर येथील सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण, मा. आल्हाद लाखनीकर, डॉ. शरयू तायवाडे, डॉ. राजेंद्र वाटाणे, डॉ. राजन जयस्वाल, डॉ. श्रीकांत नाकाडे यांसह अनेक मान्यवर व अतिथी उपस्थित होते. उदघाटन सोहळा हा अधिकच प्रभावशाली वाटला आणि उत्स्फूर्तपणे पार पाडला गेला. विशेषता झाडीबोली साहित्याची भीष्म पितामह व झाडीबोलीचे प्रणेते डॉ. हरिश्चंद्र बोरकर ज्यांचा आदरपूर्वक सत्कार हा अधिवेशनाच्या प्रसंगी केला गेला. झाडे बोली साहित्य संमेलने यांचा वारसा जपण्याचे कार्य,हे भंडारा जिल्ह्यात ही अनेक ठिकाणी घडून आलेली आहे, डॉक्टर हरिश्चंद्र बोरकर यांचे झाडे बोली साहित्य विषयी असलेले योगदान हे कधी विसरून चालणार नाही असा विचार डॉ.संजय कुमार निंबेकर यांनी आपल्या शब्दात मांडला. एकंदरीत या अधिवेशनातील सहाही सत्रात घेण्यात आलेले विषय जे प्रामुख्याने मराठी भाषीसंबंधी होते. प्रत्येक सत्र हे उत्कृष्टपणे पार पाडले गेले, खुल्या अधिवेशनात देखील बोलण्याची संधी सर्वांना मिळाली, येणाऱ्या समस्यांचे निराकरण केल्या गेले. विशेषतः नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाविषयीचा आढावा घेण्यात आला. उद्भवणाऱ्या अडचणी व समस्यांचे निराकरण करण्यात आले. प्रत्येक सत्रानुसार विषयाची मांडणी करण्यात आली व विषयाला न्याय देण्याकरता प्रमुख वक्ते तथा अध्यक्षांनीही आपली भूमिका उत्कृष्टपणे बजावली, एकंदरीत ह्या अधिवेशनात सर्वच भौतिक व्यवस्था उत्कृष्ट होती आणि प्रारंभी पासून तर समारोपीय समारंभापर्यंत सर्वांचाच प्रतिसाद लाभला. संशोधन पर लेख लिहून अभिजात मराठी भाषेवर आधारित अनेकांनी आपापले स्वतंत्र विचार मांडले.

**-डॉ.चंद्रशेखर सुधाकर देवघरे,**



**पब्लिक टॅग**
**डॉ.यशवंत घुमे**
**मो.९८२२२३३९१२**

**स्व.निर्धन पाटील वाघाये कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी. जि. भंडारा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली मराठी प्राध्यापक परिषदेच्या ३५ व्यां अधिवेशनाच्या नमित्ताने पूर्वाध्यक्ष, सेवानिवृत्त, पी. एचडी. प्राप्त प्राध्यापक यांचा सत्कार, मराठी बोली भाषेतील असामान्य कार्याबद्दल डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांचा झालेला विशेष सत्कार तसेच चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील मराठी विषयाच्या प्राध्यापकांना जोडण्याचे कार्य करणारे डॉ. राजन जयस्वाल यांना मिळालेला पहिला जीवन गौरव पुरस्कार हे उद्घाटन सोहळ्याचे खास विशेष म्हणता येईल.याच उद्घाटन सोहळ्यात मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांनी भाषा मानवाला जीवन जगायला शिकवते. मातृभाषा म्हणून मराठीचा अभिमान आहे. परंतु, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर प्राध्यापकांनी अधिक जोमाने कार्य केले पाहिजे, असा आशावाद व्यक्त केला. तर मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. अजय चिकाटे यांनी मराठी भाषा व्यावहारिक पातळीवर तसेच तिचा वापर अधिकाधिक प्रमाणात रोजारनिर्मिती करण्यासाठी केला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

परिषदेतील विविध परिसंवाद आणि अनेक सत्र या दृष्टीने विचार करता ३५ व्या अधिवेशनाने माझ्या सारख्या तरुण प्राध्यापकांनी भविष्यात माय मराठीची सेवा करण्याकरिता मराठी साहित्यातील विवध प्रवाह समृध्द करण्यासाठी सातत्यपूर्ण कामगिरी केली पाहिजे, असे मला नम्रपणे वाटते. ही शिदोरी घेऊन मी भविष्यात वाटचाल करण्याचा प्रामाणिक प्रयत्न निश्चित करेल.

**-डॉ. हेमंतकुमार बागडे**
**इंदिरा गांधी कला, वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशन समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे पार पडले. हे अधिवेशन माझ्यासाठी अनेक अंगानी महत्त्वपूर्ण ठरले. एक म्हणजे तालुक्याच्या ठिकाणी हे अधिवेशन होते; मात्र या ठिकाणी प्राध्यापकांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. शहरातील विद्यार्थ्यांची मानसिकता, त्या ठिकाणचे प्रश्न, परिस्थिती आणि गाव खेड्यावरील विद्यार्थ्यांची परिस्थिती याबाबत प्राध्यापकांशी चर्चा करताना लक्षात आली. उद्घाटनाच्या सत्रामध्ये मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश अवलगावकर यांनी मराठी प्राध्यापक, मराठी समाज यांच्याकडून असणाऱ्या अपेक्षा विशद केल्या.

या अधिवेशनात नावीन्यपूर्ण परिसंवादांचे आयोजन करण्यात आले होते. नवे शैक्षणिक धोरण: दशा आणि दिशा या परिसंवादातून संपूर्ण वर्षभर नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवत असताना ज्या अडचणी येत होत्या त्याबाबतची सविस्तर चर्चा या ठिकाणी झाली. त्यातून काही प्रश्न उपस्थित झाले आणि त्याची उत्तरेही मिळाले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला हा दर्जा मिळाल्यापासून तिच्या वास्तवाबद्दल आणि भवितव्याबद्दल उलट सुलट चर्चा होत आहेत मात्र या परिसंवादातून अभिजात असणाऱ्या मराठी भाषेचे वास्तव आणि भवितव्य याचे विविध आयाम लक्षात आले. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या बाबतीत अतिशय तीव्र भावना समोर आल्या. डॉ. गणेश मोहोड (अध्यक्ष, मराठी प्राध्यापक परिषद), डॉ. राजेंद्र वाटाणे (सचिव, मराठी प्राध्यापक परिषद) यांच्या उत्साही, स्वागतशील आणि सर्वांना जोडून घेण्याच्या स्वभावामुळे हे अधिवेशन आपलेपण देते.या अधिवेशनाचे आयोजन करणारे समर्थ महाविद्यालय यांनी इथली व्यवस्था अतिशय चोख केलेली होती. कुठेही कसलीही कमतरता नव्हती. एकूणच या अधिवेशनातून एक वैचारिक शिदोरी घेऊन पुन्हा नव्या जोमाने पुढच्या कार्यासाठी सज्ज झालो आहे.

**-डॉ.सुधीर ब. मोरे**
**वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था (मॉरिस कॉलेज), नागपूर.**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली मराठी प्राध्यापक परिषदेचे ३५ वे अधिवेशन मोठ्या दिमाखात समर्थ महाविद्यालय, लाखनी,जिल्हा भंडारा येथे पार पडला. या परिषदेचा साक्षीदार म्हणून मला अधिवेशनाने काय दिले? ह्या प्रश्नाचे उत्तरे शोधताना आनंद होत आहे की, मी २०१० पासून प्राध्यापक म्हणून महाविद्यालयात रुजू झालो. अनेक परिसंवाद, चर्चासत्र आजवर मराठी प्राध्यापक परिषदेत नेहमी आनंदात सहभाग घेत होतो; परंतु मला या अधिवेशन प्रसंगी अधिवेशनाच्या निमंत्रण पत्रिकेत नाव येण्याचा योग प्राचार्य डॉ. दिगांबर कापसे सर यांच्यामुळे आला. कदाचित माझा स्नेह व माजी विद्यार्थी या नात्याने आला असावा. मी या अधिवेशनात प्रथमतः निबंध वाचन व सूत्रसंचालन यशस्वीरित्या पूर्ण करू शकलो. यामुळे माझे मन आनंदाने फुलून प्रफुल्लित झाले. याप्रसंगी उद्घाटक आदरणीय सहसंचालक डॉ. संतोष चव्हाण सर, अभिजात मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू आदरणीय डॉ.अविनाश आवलगावकर सर, संमेलनाध्यक्ष डॉ. अजय चिकाटे सर, मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड सर, सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे, व इतर विचारवंत, साहित्यिक समीक्षक यांची बौद्धिक मेजवानीचा आस्वाद या प्रसंगी घेता आला, हे माझ्यासाठी भाग्याचे समजतो. दोन्ही दिवसांची व्याख्यानमाला समृद्ध करणारी होती. हे अनुभवताना मला अभिमान वाटतो. या परिषदेतून वैचारिक विचारांची देवाण घेवाण माझ्यासाठी एक पर्वणीच आहे ,असं मला जाणवते. या परिषदेने अनेक नवीन युवा प्राध्यापकांना स्टेज व त्यांच्या कलागुणांना वाव देऊन एक नवचैतन्य निर्माण करून दिले, हे परिषदेचे मोठेपण म्हणावे लागेल. या परिषदेने पदाधिकारी, आयोजक व प्राचार्य तसेच समस्त कर्मचारी वर्गाने सर्वांनी यथोचित मेजवानी व आदर, सन्मान केले, हे अतिशय महत्त्वाचे आहे. या परिषदेने मला भरभरून नव्हे तर समाजाला, देशाला दिशा देण्याचे कार्य केले आहे ,असे म्हणावे लागेल. या सर्वांचे श्रेय मराठी प्राध्यापक परिषदेचे अध्यक्ष डॉ. गणेश मोहोड सर, सचिव डॉ. राजेंद्र वाटाणे सर व इतर सहभागी सहकार्यांना निश्चितच जाते असे म्हणावे लागेल. हे अधिवेशन माझ्यासाठी अविस्मरणीय ठरणारे आहे, असं मला वाटते.

**-डॉ.जगदीश भैसारे**
**स्व.निर्धनराव पाटील वाघाये महाविद्यालय, चोपा.**

## मास्टरजीनियस आर्यन तात्यासाहेब जाधव अबॅकस आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विजयी

**सोलापूर । प्रतिनिधी**



पुणे येथे झालेल्या तसेच ऑनलाईन आयोजित आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत आर्यन तात्यासाहेब जाधव याने विक्रमी कामगिरी करत आपले कौशल्य सिद्ध केले. ग्रँड चॅम्पियन परीक्षेत त्याने अवघ्या पाच मिनिटांत १०० गणिते सोडवून उच्चांक प्रस्थापित केला आणि प्रथम क्रमांक मिळवला.

तसेच, वैदिक गणिताच्या पहिल्या स्तरावरील स्पर्धेत त्याने सात मिनिटांत १०० पैकी १०० गुण मिळवत फर्स्ट रँक प्राप्त केली. या उल्लेखनीय यशासाठी मुथा अबॅकस अकॅडमीच्या संचालिका ज्योती मुथा यांचे त्याला अनमोल मार्गदर्शन लाभले.

## तुरीचे गडगडलेले दर: शेतकऱ्यांच्या हातावर तुरीच!

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

तुरीच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. केंद्र सरकारने ७,५५० रुपये हमीभाव जाहीर केला असतानाही तुरीला बाजारात सरासरी ६,८०० ते ७,००० रुपये दर मिळत आहे. परिणामी, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल होईना.

खरिपातील नगदी पीक असलेल्या तुरीचे दर अपेक्षेपेक्षा कमी मिळाल्याने शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. अवकाळी पावसामुळे तुरीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. हे पीक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना अधिक खर्च करावा लागला, मात्र आता विक्रीच्या वेळी हमीभावाऐवजी कमी दर मिळत असल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत.शेतकऱ्यांना वाटले होते की, यंदा तुरीच्या उत्पादनात घट झाल्याने दर वाढतील, परंतु प्रत्यक्षात तुरीचे दर कोसळले. सोयाबीनच्या नुकसानीनंतर शेतकऱ्यांची तुरीवर अपेक्षा होती, मात्र तिलाही हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत.सुपा आणि पारनेर भागात नव्या तुरीची बाजारात आवक सुरू झाली आहे. पुढील काळात आवक वाढल्यास दर आणखी घसरण्याची शक्यता असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.बाजारातील सद्यस्थिती पाहता तुरीचे दर स्थिर राहतील की आणखी घसरण होईल, याची चिंता शेतकऱ्यांना सतावते आहे. किमान हमीभाव मिळावा आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीवर तोडगा निघावा, अशी जोरदार मागणी होत आहे.



## माऊली मल्टीस्टेट बँकेचे अध्यक्ष डॉ.सुनील सरोडे यांना पत्रकार सेवा संघाचा जीवनगौरव पुरस्कार

**गंगापूर । प्रतिनिधी**

माऊली मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष डॉ. सुनील सरोडे यांना महाराष्ट्र पत्रकार सेवा संघाचा सह्याद्री जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. ९ फेब्रुवारी रोजी लासूर स्टेशन (ता. गंगापूर) येथे त्यांना हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



माऊली मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेने आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने भरीव वाटचाल केली असून सध्या १६ शाखा कार्यरत आहेत, तर कन्नड येथे १७ वी अत्याधुनिक शाखा सुरू होत आहे. या बँकेच्या माध्यमातून अनेक तरुणांना व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून देत त्यांना स्वावलंबी बनवण्याचे महत्वपूर्ण कार्य डॉ. सरोडे यांनी केले आहे. या सामाजिक व आर्थिक योगदानाची दखल घेत पत्रकार सेवा संघातर्फे त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**डॉ. सुनील सरोडे यांची प्रतिक्रिया :**पत्रकार सेवा संघाने मला बँकिंग क्षेत्रातील योगदानाबद्दल सह्याद्री जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे, याबद्दल मी संघाचे मनःपूर्वक आभार मानतो. हा सन्मान माझ्या पुढील सामाजिक व बँकिंग क्षेत्रातील कार्यासाठी प्रेरणादायी ठरेल. पत्रकार सेवा संघ ज्या क्षेत्रातील उल्लेखनीय व्यक्तींना हा पुरस्कार देतो, ती अत्यंत गौरवास्पद बाब आहे. या पुरस्कारामुळे सर्व विजेत्यांना आणखी जोमाने कार्य करण्याची ऊर्जा मिळेल.हा सन्मान डॉ. सुनील सरोडे यांच्या बँकिंग क्षेत्रातील नवकल्पना व समाजहितैषी योगदानाची पावती आहे.

## श्री दिलीप दत्तू मोकाटे यांना प्रगतशील शेतकरी म्हणून राज्यस्तरीय पुरस्कार

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील पालखेड गावातील शेतकरी दिलीप दत्तू मोकाटे यांनी आधुनिक शेतीच्या पद्धतींनी पंचक्रोशीतील शेतकऱ्यांमध्ये आपले नाव प्रगतीशील शेतकरी म्हणून प्रस्थापित केले आहे. त्यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी शिक्षणाशिवाय शेतीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. यामुळे त्यांनी अनेकांना आदर्श घालून शेती करण्याची दिशा दाखवली आहे. मोकाटे यांच्या शेतामध्ये शेतीचे अनेक आधुनिक तंत्रे वापरली जातात. त्यांनी शेडनेट, ड्रीप इरिगेशन आणि शेततळे यांसारखी सुविधा उभारली आहे. त्यांचे शिमला मिरची उत्पादन विशेष आकर्षणाचे ठरले आहे. एक एकराच्या शेडनेटमध्ये शिमला मिरचीच्या उत्पादनामुळे ते शिमला मिरची किंग म्हणून ओळखले जातात. पंचक्रोशीतील शेतकरी त्यांचे उत्पादन पाहण्यासाठी रोज भेट देतात. त्यांच्या शेतामध्ये रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी त्यांनी गांडुळ खत प्रकल्प सुरू केला आहे, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होण्यास मदत होते. शेतकऱ्यांना शेती संबंधित मार्गदर्शन देण्याचे त्यांचे कार्यही उल्लेखनीय आहे. त्यांनी इतर शेतकऱ्यांना सरकारी योजनांची माहिती देऊन त्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून दिला आहे. शेतीपूरक सर्व आधुनिक पद्धतीची अवजारे त्यांच्या शेतात उपलब्ध आहेत, ज्यांचा वापर पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना दिला जातो. यामुळे ते एक उत्तम प्रगतशील शेतकरी, उद्योजक आणि समाजसेवक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्याची दखल घेत ९ फेब्रुवारी २०२५ रोजी त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवले जाणार आहे. त्यांच्या या यशामुळे पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



# राष्ट्रपिता गांधी पुण्यतिथी व जागतिक कुष्ठरोग निवारण दिनानिमित्त शेगाव आरोग्य केंद्रात प्रेरणादायी सोहळा

**वरोरा । प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच जागतिक कुष्ठरोग निवारण दिन आणि 'कुष्ठरोग शोध मोहीम (LCDC) २०२५' या सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांचा संगम साधणारा विशेष कार्यक्रम प्राथमिक आरोग्य केंद्र, शेगाव येथे संपन्न झाला. सहाय्यक संचालक आरोग्यसेवा (कुष्ठरोग), चंद्रपूर, तालुका आरोग्याधिकारी कार्यालय, वरोरा आणि महारोगी सेवा समिती, आनंदवन यांच्या संयुक्त सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाचे उद्घाटन सहा. संचालक आरोग्यसेवा (कुष्ठरोग) डॉ. संदीप गेडाम, तालुका कुष्ठरोग विभाग अधिकारी डॉ. प्रतिक बोरकर, सीतारतन लेप्रसी हॉस्पिटल, आनंदवनचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय पोळ, वैद्यकीय अधिकारी डॉ. कृष्णा कुद्रधर, प्राथमिक आरोग्य केंद्र, शेगावच्या अधीक्षक डॉ. रिझवाना परविन, तसेच कार्यकारी विश्वस्त सुधाकर कडू यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यानंतर महात्मा गांधी व डॉ. हॅन्सन यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करण्यात आली. तालुका कुष्ठरोग विभाग अधिकारी डॉ. प्रतिक बोरकर यांनी 'कुष्ठरोग शोध मोहीम (LCDC) २०२५' बाबत सविस्तर माहिती दिली. तसेच, प्राथमिक आरोग्य केंद्र, शेगावच्या नव्या सेवा विस्ताराची घोषणा त्यांनी केली. डॉ. कृष्णा कुद्रधर यांनी दृकश्राव्य माध्यमातून कुष्ठरोगाचे निदान, उपचार आणि जनजागृती यावर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संदीप गेडाम यांनी महाराष्ट्रातील कुष्ठरोग रुग्णसंख्या आणि बालकांमध्ये आढळणाऱ्या वाढत्या प्रकरणांबाबत चिंता व्यक्त केली. कुष्ठरोग हा योग्य उपचाराने बरा होणारा रोग असून, घराघरात तपासणी करून तो हद्दपार करण्याच्या मोहिमेत अधिक जोमाने सहभाग घेण्याचे आवाहन त्यांनी केले. 'ङउऊऊ २०२५' प्रभावीपणे राबविल्यास २०२७ पर्यंत महाराष्ट्र आणि संपूर्ण भारत कुष्ठरोगमुक्त होऊ शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्रीमती सावरकर यांच्या नेतृत्वाखाली उपस्थितांनी कुष्ठरुग्णांप्रती समानतेची वागणूक राखण्याची प्रतिज्ञा घेतली. त्यानंतर महात्मा गांधींना श्रद्धांजली म्हणून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. महारोगी सेवा समितीचे कार्यकारी विश्वस्त सुधाकर कडू यांनी आनंदवनातील कुष्ठरोगमुक्त बांधवांच्या आत्मनिर्भरतेबद्दल माहिती दिली. पोलीस, शिक्षक, वकील, सैनिक अशा विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या कुष्ठरोगमुक्त व्यक्तींची उदाहरणे देत, या रुग्णांसाठी समाजाने दृष्टीकोन बदलण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. या समारंभाला वाते (P.M.W.), डॉ. गंपावार, डॉ. राकेश बांगडकर, डॉ. इस्माईल पठाण, माधव कवीश्वर, कपिलदेव कदम आणि आशा वर्कर्स यांची उपस्थिती लाभली. कीर्ती लोहोकरे यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले, तर डॉ. झाडे यांनी आभारप्रदर्शन केले. अशा प्रकारे, प्रेरणादायी विचार आणि समाजप्रबोधनाचा संदेश देणारा हा कार्यक्रम अत्यंत स्मरणीय ठरला.



# शालेय क्रीडा–सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप आर्वी पंचायत समितीला सर्वसाधारण विजेतेपद

**वर्धा । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत कलेचे व क्रीडागुण जोपासणे गरजेचे आहे. या माध्यमातून बुध्दीमत्तेच्या विकासासोबतच आरोग्यही सुदृढ राहते, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले. ते जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या बक्षीस वितरण समारंभात बोलत होते.



जिल्हा परिषदेतर्फे तीन दिवस चाललेल्या या महोत्सवात वर्धा, आर्वी, कारंजा, आष्टी, देवळी, हिंगणघाट, समुद्रपूर व सेलू पंचायत समित्यांतील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकार व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.बक्षीस वितरणावेळी शिक्षणाधिकारी नितू गावंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रा.ज. पराडकर, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी डॉ. मंगेश घोगरे, आर्वी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सुनीता मरस्कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या पंचायत समित्यांच्या संघांचा गौरव करण्यात आला. उत्कृष्ट कामगिरीबद्दल आर्वी पंचायत समितीला सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक देण्यात आला.या महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो आणि त्यांच्यात आत्मविश्वास वाढतो, असेही जितीन रहमान यांनी यावेळी सांगितले.

# शेतकऱ्यांच्या खात्यात ३०९ कोटी धानाचे चुकारे जमा

**भंडारा । प्रतिनिधी**

आधारभूत किंमत धान खरेदी योजना खरिप पणन हंगाम २०२४-२५ अंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये रक्कम रुपये ३०९ कोटी ऑनलाईन पद्धतीने जमा केली आहे. भंडारा जिल्ह्यातील ज्या धान खरेदी केंद्राच्या प्रमाणीत हुंड्या कार्यालयात जमा करण्यात आलेल्या आहे. त्या धान केंद्रांच्या शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली आहे.



दि.३०/०१/२०२५ रोजी जिल्ह्यातील धान खरेदी केंद्रावर एकूण १,६५,८२० शेतकऱ्यांची नोंदणी झालेली असून ९०,४२१ शेतकऱ्यांकडून २८,४३,०६०.८५ क्विंटल धान खरेदी झालेली आहे.

शासन पत्रान्वये खरिप पणन हंगाम २०२४-२५ मधील धान खरेदी करिता दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदत वाढीच्या कालावधीत धान खरेदी करिता शासनाने दिलेल्या सर्व निर्देशांचे तंतोतंत पालन करूनच नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून धानाची खरेदी करण्यात यावी, असे आवाहन डॉ. संजय कोलते जिल्हाधिकारी भंडारा यांचे निर्देशानुसार, सुधीर एस. पाटील, जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांनी केले आहे.

# माझी वसुंधरा दिंडीने दुमदुमले स्मार्ट ग्राम बिबी

**कोरपना । प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियानाच्या अंतर्गत पर्यावरण संरक्षण व स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले. या दिंडीने संपूर्ण स्मार्ट ग्राम बिबीला जागरूकतेच्या संदेशांनी दुमदुमून टाकले.या दिंडीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना शरदराव पवार महाविद्यालय गडचांदूर, ग्रामपंचायत बिबी, गुरुदेव सेवा मंडळ, महात्मा गांधी पुतळा समिती तसेच गावातील विविध महिला भारुड भजन मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दिंडी दरम्यान, पर्यावरण संरक्षण, जलसंधारण, स्वच्छता आणि वृक्षारोपणाचा महत्त्वाचा संदेश देण्यात आला.

गावातील प्रमुख रस्त्यांवरून गेलेल्या या दिंडीने वृक्ष लावा, वृक्ष वाचवा, प्लास्टिक हटवा, पर्यावरण वाचवा अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. सहभागी मंडळांनी भारुड आणि भजनांच्या




माध्यमातून समाजप्रबोधन करत जनतेला पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी पर्यावरणप्रेमींनी १०० बांबुचे वृक्षारोपण करून हरित भविष्याची शपथ घेतली. स्थानिक नागरिक व युवकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. माझी वसुंधरा दिंडी गावाच्या प्रगतीसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरली आहे.

# छायाचित्रकार देवा बुरडकर यांचा समाजातर्फे गुणगौरव

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विश्वकर्मामय सुतार (झाडे) समाज महासंघच्या वतीने ३७ वा राज्यस्तरीय उपवर-उपवधू व पालक परिचय मेळावा २०२५ चे आयोजन नुकतेच पार पडले त्यात चंद्रपूरचे प्रख्यात छायाचित्रकार देवा बुरडकर यांचा विषेश सत्कार करण्यात आला.सविस्तर असे की, महाराष्ट्र विश्वकर्मामय सुतार (झाडे) समाज महासंघाने शनिवार, रविवार दि. ०१ व ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी शकुंतला फार्मस्, नागपूर रोड, चंद्रपूर येथे ३७ वा राज्यस्तरीय उपवर-उपवधू व पालक मेळाव्याचे आयोजन केले होते.

या आयोजना दरम्यान सलग तीन वर्षापासून सदर आयोजित मेळाव्याची शुटींग व छायाचित्रे काढण्याची धुरा चंद्रपूरचे प्रख्यात छायाचित्रकार देवा बुरडकर यांच्यावर सोपविली होती ती त्याने योग्य पार पाडले.



सत्कार या साठी करण्यात आला आहे त्याचा चित्रपट सृष्टीमध्ये देखील विशेष नाव चमकत आहे परिचय मेळावा जो चित्रपटाचा ट्रेलर दाखवण्यात आला चित्रपट सृष्टीमध्ये आपल्या समाजाचा देखील नाव आहे हे ऐकून आपल्या सगळ्यांचा अभिमान वाटेल असं हे नाव आहे देवा बुरडकर , गेले तीन वर्ष आमच्या पाठीशी सतत देवा उभा आहे देवासारखा आणि फोटोग्राफी व्हिडिओग्राफी आणि जे म्हटलं ते करून देतो त्याबद्दल देवा बुरडकर व प्रीतम खोब्रागडे त्यांची सगळी टीम देखील अतिशय आमच्या परिचयाचे झालेली आहे त्यांचे देखील मी खूप खूप आभार मानले सत्काराच्या प्रसंगी यांनी हे गौरव उद्गार काढले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेशराव महादेवराव वांढरे तर कार्यक्रमाचे उद्घाटक नितीन कवडूजी भटारकर हे होते अध्यक्ष,ज्योतीताई प्रमोद राखुंडे ,सतीश विठ्ठलराव माणूसमारे, संतोष भाऊराव बोरीकर आणि प्रमुख पाहूणे डॉ. प्रशांत अंबादासजी माणुसमारे, डॉ. महेश योगेशराव बोरीकर, डॉ. उषा दिलीपराव गहुकार (राखुंडे), डॉ. सुधाकर यशवंतराव साखरकर यांनी उपस्थित होते तसेच विशेष आमंत्रीत मान्यवरात आ. किशोरभाऊ जोरगेवार ,दगडू सुखदेवजी कुंभार, विजय जनार्दनराव बोरीकर उपस्थित होते.

# महावितरणच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्यांचा लाखो रुपयांचा ऊस जळून खाक;ग्रामस्थांची भरपाईची मागणी

**वैजापूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील गोळवाडी येथील शेतकरी एकनाथ बाबुलाल मांजरे यांचे एक एकर ऊसपिक महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे जळून खाक झाले. गावाजवळील बोरगाव धरणात पाणीसाठा कमी असल्याने महावितरणकडून रात्रंदिवस दोन फेज डीपीमध्ये सोडली जाते, त्यामुळे विद्युत पंप सतत सुरू राहतात. परिणामी, वायर गरम होऊन स्पार्किंग झाली आणि उसाला भीषण आग लागली.



ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, महावितरणने दोन फेज डीपीमध्ये सोडू नये, अन्यथा अशाच प्रकारे आणखी शेतकऱ्यांचे नुकसान होईल. तसेच, तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांनी केली आहे.

# पाच शाळकरी विद्यार्थ्यांच्या नेतृत्वात पिंपळनेर व साक्रीच्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या विरोधात आंदोलन करणार

**धुळे । प्रतिनिधी**

साक्री तालुका व काटवान परिसरातील अवैद्य वृक्षतोडीच्या विरोधात शाळकरी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला आहे. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी, बुधवार, सकाळी ११ वाजता, तहसीलदार साक्री यांच्या कार्यालयासमोर आंदोलन होणार आहे. हे आंदोलन वन विभागाच्या भ्रष्ट, कर्तव्यहीन व अवैध वृक्षतोड व्यापारी व दलालांशी संगनमत असलेल्या अधिकाऱ्यांविरोधात शांततेच्या मार्गाने होईल.



विद्यार्थ्यांनी या आंदोलनाचे नेतृत्व घेतले असून, त्यांनी संपूर्ण तालुक्यातील पर्यावरणप्रेमी नागरिकांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्याद्वारे हे स्पष्ट करण्यात आले आहे की, वृक्षतोडीमुळे २०-३० वर्ष वयोमानाची मोठी वृक्ष तोडली जात आहेत, ज्यामुळे साक्रीचा निसर्ग खूपच प्रभावित होत आहे.आम्ही काही दिवसांपासून या विषयावर वनमंत्री व विभागाच्या सर्व वरिष्ठ अधिकारी यांच्याशी संपर्क साधत आहोत, परंतु त्यांच्याकडून काहीही प्रतिसाद मिळालेला नाही. जर आंदोलनानंतरही कोणतीही कारवाई झाली नाही, तर आम्ही थेट वनमंत्र्यांच्या दालनात ठिय्या देऊ, असे आंदोलनाचे आयोजक विद्यार्थ्यांनी सांगितले.शाळकरी विद्यार्थ्यांचे नेतृत्व या आंदोलनाच्या माध्यमातून नवा आदर्श निर्माण करत आहे. सर्व नागरिकांना विनंती करण्यात आली आहे की या आंदोलनात सहभागी होऊन निसर्गाच्या रक्षणासाठी योगदान देणारे एक महत्त्वाचे पाऊल उचलावे.

# ब्रिलीअंट स्कूल हिंगणघाट येथे सांस्कृतीक महोत्सव उत्साहात संपन्न

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्या विकास शिक्षण संस्था हिंगणघाट द्वारा संचालित ब्रिलीअंट स्कूल हिंगणघाट येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा व अंगी असणाऱ्या कलेचे प्रदर्शन करता यावे या उद्देशाने चार दिवसीय सांस्कृतीक महोत्सव आयोजित करण्यात आला.प्रसंगी अध्यक्ष म्हणून डॉ नयना तुळसकर सचिव विद्या विकास शिक्षण संस्था हिंगणघाट, उद्घाटक म्हणून श्रीमती रेखा तुळसकर कोषाध्यक्ष विद्या विकास शिक्षण संस्था हिंगणघाट, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ उमेश तुळसकर अध्यक्ष विद्या विकास शिक्षण संस्था हिंगणघाट, डॉ महेन्द्र गुंडे प्राचार्य तुळसकर कॉलेज ऑफ फार्मसी हिंगणघाट,नितेश रोडे प्राचार्य विद्या विकास कनिष्ठ महाविद्यालय हिंगणघाट व आयोजक प्रा अभय दांडेकर मुख्याध्यापक ब्रिलीअंट स्कूल हिंगणघाट यांची उपस्थिती होती



कार्यक्रमाची सुरूवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली प्रसंगी महोत्सवाच्या प्रथम दिवशी आयोजीत क्रिडा स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली, संस्कृतिक महोत्सवात विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांनाही मंच मिळावा म्हणून गितगायण स्पर्धा, वन मिनिट शो, माईंड गेम घेण्यात आले व विजयी पालकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

सांस्कृतिक महोत्सवात विद्यार्थ्यानी वेगवेगळ्या विषयांना हात घालून नृत्य व नाटीकेच्या माध्यमातून सादरीकरण केले, त्यात देशभक्ती गीत, सामाजिक बांधिलकी दर्शविणारे नृत्य, शेतकरी नृत्य, हॉरर नृत्य व यासोबतच देशाची विविधता दर्शविणारी नृत्ये सादर करण्यात आली, प्रसंगी विद्यार्थ्यांसोबत पालकांनीही नृत्य सादर करीत कार्यक्रमात रंगत आणली.

डॉ उमेश तुळसकर यांनी पालकांच्या सहकार्याबद्दल व यशस्वी सहभागाबद्दल आभार मानून विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या प्रगतिकरिता असेच सहकार्य लाभो असे आवाहन केले, डॉ नयना तुळसकर यांनी विद्यार्थ्यांनी व पालकांनी उत्साहीपणे सहभागी होवून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल समाधान व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याकरीता संस्था कटिबध्द आहे असे प्रतिपादन केले, कार्यक्रमाचे प्रस्ताविक करतांना प्रा अभय दांडेकर यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता मेहनत घेणाऱ्या सर्व शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांचे कौतुक करून आभार मानले व महोत्सवाचे औचित्य सर्वांसमोर मांडले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका रूजुता बेद्रे व कल्याणी झिलपे यांनी केले,कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी वृंद आणि विद्यार्थी विद्यार्थिनी व पालकांनी सहकार्य केले.

# राष्ट्रीय सेवा योजना सामाजिक बांधिलकी निर्माण करते-हरीश इथापे

## सात दिवसीय शिबिराचा समारोप;५५ स्वयंसेवकांचा सहभाग

**देवळी । प्रतिनिधी**

'आजच्या मोबाईलच्या युगात सामाजिक जाणीव संपण्याच्या वाटेवर आहे. अशा अवस्थेत तरुण-तरुणींना सामाजिक बांधिलकी निर्माण होईल अशा प्रकारचे उपक्रम महाविद्यालय स्तरावर आयोजित करण्याचे नितांत गरज आहे. या दृष्टिकोनातून राष्ट्रीय सेवा योजना सामाजिक बांधिलकी निर्माण करते, असे प्रतिपादन ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक तथा मराठी चित्रपट दिग्दर्शक हरीश इथापे यांनी नांदोरा ग्राम येथे संपन्न झालेल्या एस एस एन जे कनिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराच्या समारोप प्रसंगी ३१ जानेवारी रोजी केले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध उद्योजक तथा समाजसेवक मोहनबाबू अग्रवाल तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक हरीश इथापे, नांदोरा ग्रामचे सरपंच राजू इंगोले, प्राचार्य डॉ. सुनिता सोनारे, शिबिर प्रमुख तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर, रोव्हर लीडर संतोष तुरक, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. जगदीश यावले, प्रा. मेघा फासगे व प्रा. नीलिमा बरगट उपस्थित होते. कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे सात दिवसीय विशेष समाज सेवा शिबिर नांदोरा ग्राम येथे २५ जानेवारी ते ३१ जानेवारी या दरम्यान संत ज्ञानेश्वर देवस्थान परिसरात आयोजित करण्यात आले होते. यात ५५ स्वयंसेवकांनी भाग घेतला. सदर शिबिरात ग्राम स्वच्छता अभियान, व्यसनमुक्त गाव चळवळ, पाणी वाचवा पाणी जिरवा, वृक्षारोपण व संवर्धन या विषयावर जनजागृती मोहीम राबविण्यात आली. याशिवाय वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम, प्रबोधनापर व्याख्याने, चित्रकला स्पर्धा निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. साने गुरुजी विद्यालय येथील दहावीच्या विद्यार्थ्यांकरीता इतिहास प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून 'कोमल शितळे व पायल चौके' यांना गौरव प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शिबिराची जबाबदारी आदर्श नाईक, मनोज नेहारे, साक्षी येळणे व राष्ट्रीय सेवा योजना चे स्वयंसेवकांनी यशस्वीरित्या पार पाडली. याप्रसंगी निबंध स्पर्धेत निशा कांबळे, त्रिशा विरपाते व गुंजन यांना प्रथम द्वितीय व तृतीय पुरस्कार तर वक्तृत्व स्पर्धेत विकी पेंदोरकर, कुंदन कावडे व निखिल मेश्राम यांना प्रथम द्वितीय व तृतीय पुरस्काराने गौरविण्यात आले. शिबिरादरम्यान भव्य महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात तृप्ती राजेश बकाने प्रमुख अतिथी म्हणून तर अध्यक्षस्थानी वैशाली येरावार यांनी स्थान भूषवले. नांदोरा ग्राम येथील ४०० महिलांनी यात सहभाग नोंदवला प्रास्ताविक भाषण शिबीर प्रमुख कॅप्टन मोहन गुजरकर यांनी करून राष्ट्रीय सेवा योजना चळवळीचा मुख्य उद्देश व शिबिराची यशोगाथा सांगितले. शिबिराचे मनोगत पूर्वा कापटे व कुंदन कावडे यांनी व्यक्त केले. समारोपीय कार्यक्रमाच्या संचालन पायल चौके व सत्येश्वरी सावरकर यांनी केले. अतिथींचे आभार वैष्णवी कन्नाके हिने मानले. यशस्वीतेकरिता आदर्श नाईक मनोज नेहारे, नयन तुमसरे व स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

## श्री दत्त कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हदगावच्या राष्ट्रीय सेवा योजनेत श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन

**नांदेड । प्रतिनिधी**

श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हदगावच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे बाभळी (ता. हदगाव) येथे श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यंदाच्या शैक्षणिक वर्षात (२०२४-२५) मौजे बाभळी हे गाव राष्ट्रीय सेवा योजनेसाठी दत्तक गाव म्हणून निवडण्यात आले आहे.शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषद पूर्व प्राथमिक शाळेत पार पडले. ग्रामपंचायत सरपंच धर्मीबाई आडे, प्रमुख वक्ते शाहीर गजानन पाटील वाटेगावकर, शालेय मुख्याध्यापक, व्यवस्थापन समिती अध्यक्ष, महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



३१ जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत होणाऱ्या या शिबिरात स्वच्छ भारत अभियान, माझी वसुंधरा अभियान, आपत्ती व्यवस्थापन, शोषखड्डा निर्मिती, जलसंवर्धन जनजागृती, वनसंवर्धन सर्वेक्षण आणि पायवाट नूतनीकरण यांसारखे विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. वीरेश देशमुख यांनी शिबिराचे उद्दिष्ट स्पष्ट केले. सूत्रसंचालन विजया चव्हाण आणि पौर्णिमा देशमुख यांनी केले, तर आभार प्रा. शंकर माने यांनी मानले.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अश्विन नरवाडे, प्रा. डॉ. देविदास हलगे, प्रा. अनिल शिंदे, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर कदम आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.
धर्मीबाई मनोज आडे (सरपंच, ग्रामपंचायत बाभळी), रामदास माधवराव पाटील (शालेय समिती अध्यक्ष), संजय माधवराव पाटील, मुख्याध्यापक सूर्यवंशी डी. एस., रणजीत पाटील, कबीर पाटील, विजय पाटील, गणेश पाटील, प्रवीण , चव्हाण , खंदारे, विनोद पावडे, विलास राठोड, बालाजी वाढवे, पुंजाराम काळबांडे, भुजंग काळबांडे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्री समर्थ पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांकडून 'माहेर' संस्थेत प्रेरणादायी समाजसेवा

**पारनेर । प्रतिनिधी**

श्री समर्थ अकॅडेमी संचालित श्री समर्थ पॉलिटेक्निक, म्हसणे फाटा येथील संगणक विभाग आणि प्रथम वर्षाचे विद्यार्थ्यांनी शिरूर येथील 'माहेर' संस्थेत पुस्तकदान आणि विविध मदत वस्तूंचे वाटप केले. 'माहेर' संस्था ही अनाथ मुलांसाठी काम करणारी एक सामाजिक संस्था आहे, जी दुर्लक्षित, अनाथ आणि वंचित मुलांना आश्रय, शिक्षण, आरोग्यसेवा आणि आत्मसन्मानाने जगण्यासाठी योग्य वातावरण पुरवते. या संस्थेचा मुख्य उद्देश समाजातील अशा दुर्बल घटकांना आत्मनिर्भर बनवणे आहे.विद्यार्थ्यांनी या उपक्रमात संस्थेतील मुलांसाठी शैक्षणिक सामग्री, दैनिक उपयोगाच्या वस्तू तसेच लहान मुलांसाठी एक अल्पोपाहाराचे आयोजन केले. या



सामाजिक कार्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला आणि आपल्या कृतीतून समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव निर्माण केली. विद्यार्थ्यांनी संस्थेतील मुलांशी संवाद साधला आणि त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. या संवादामुळे मुलांना आधार आणि सहानुभूती मिळाली.
विद्यार्थ्यांनी सांगितले की, या भेटीतून त्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव झाली आणि समाजातील दुर्बल घटकांप्रती आपले कर्तव्य समजले. विद्यार्थ्यांना समाजसेवेचे महत्त्व पटवून दिले. श्री समर्थ पॉलिटेक्निकचे प्राचार्य डी. डी. देसले यांचे विशेष मार्गदर्शन आणि पाठिंबा लाभला. तसेच, संस्थेचे संचालक कैलास गाडीलकर यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रेरित केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. एस. एस. दरोडे आणि प्रा. एम. व्ही. जाधव यांनी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी मिळून आयोजित केलेला हा उपक्रम एक सामाजिक बांधिलकीच्या कार्यात रूपांतरित झाला. 'माहेर' संस्थेच्या वतीने या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.

## वैभव गायकवाड यांना अटक करण्या साठी महेश गायकवाड यांचा मूक मोर्चा

**ठाणे । प्रतिनिधी**

सुमारे एक वर्षापूर्वी कल्याण पूर्व येथील शिवसेनेचे तत्कालीन शहर प्रमुख महेश गायकवाड यांच्यावर उल्हासनगरच्या हिल लाईन पोलिस ठाण्यात तत्कालीन आमदार गणपत गायकवाड यांनी अंदाधुंद गोळीबार केला होता. या हल्ल्यात महेश गायकवाड यांना सहा गोळ्या लागल्या होत्या, मात्र ते बचावले. घटनेनंतर गणपत गायकवाड यांना तात्काळ अटक करण्यात आली होती.
या घटनेशी संबंधित काही आरोपींची अजूनही धरपकड सुरू आहे, मात्र गणपत गायकवाड यांचा मुलगा वैभव गायकवाड एक वर्षापासून फरार आहे, आणि पोलिसांनी त्याला अद्याप अटक केली नाही. महेश गायकवाड यांनी याबद्दल खूप नाराजी व्यक्त केली आहे, तसेच अटकेत असलेल्या गणपत गायकवाड यांना पोलिसांकडून व्हीआयपी ट्रीटमेंट मिळत असल्याचेही ते म्हणाले. गणपत गायकवाड यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करून त्यांना मजा करण्याची परवानगी दिली जात आहे, असा आरोप महेश गायकवाड यांनी केला आहे.
याच विरोधात, आज महेश गायकवाड यांनी उल्हासनगरच्या डीसीपी कार्यालयावर मूक मोर्चा काढला. या मोर्चात महेश गायकवाड यांचे ४०० ते ५०० समर्थक सहभागी झाले होते. यावेळी डीसीपी सचिन गोरे यांनी आरोपींना लवकरात लवकर पकडण्याची मागणी स्वीकारली आणि त्यावर त्यांची




भूमिका स्पष्ट केली. महेश गायकवाड यांनी पुढे इशारा दिला की, जर मागणी पूर्ण केली नाही तर ते मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयावर पुढील मोर्चा काढणार आहेत.महेश गायकवाड यांनी आपल्या वक्तव्यात म्हटले, लोकशाहीवरील हल्ला एक वर्षानंतरही न्याय अपूर्ण आहे. याच पार्श्वभूमीवर, मी महाराष्ट्र पोलीस प्रशासन आणि गृह विभागाला आवाहन केले की, मुख्य सूत्रधार असणारा वैभव गायकवाड याला त्वरित अटक करावी आणि सर्व दोषींना कडक शिक्षा द्यावी, अन्यथा लोकशाही आणि न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास पूर्णतः अस्थिर होईल.

## ओबीसी महामंडळाव्दारा स्वयंरोजगाराची सुवर्ण संधी

**भंडारा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील ओबीसी प्रवर्गातील लोकाना स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी तसेच उच्च शिक्षणाकरिता शासनाने बहुजन कल्याण विभागांतर्गत महाराष्ट्र इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या महामंडळामार्फत कृषी संलग्न व्यवसाय वृद्धीसाठी अत्यंत अल्प व्याजदराने तसेच बिनव्याजी दराने कर्ज वितरीत करण्यात येते. महामंडळाच्या योजना खालीलप्रमाणे आहे.

**बीज भांडवल योजना**

हि योजना राज्यातील राष्ट्रीयकृत बँकेमार्फत राबविली जाते. यामध्ये महामंडळाचा सहभाग २०% लाभार्थ्यांचा सहभाग ५%, व बँकेचा सहभाग. या योजनेमध्ये महत्तम प्रकल्प मर्यादा रु. ५ लक्ष आहे. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे.

**थेट कर्ज योजना**

हि योजना महामंडळामार्फत राबविली जाते. यामध्ये महत्तम कर्ज मर्यादा रु. १ लक्ष असून परतफेडीचा कालावधी ४ वर्ष आहे. या योजनेत शेतीला पूरक किंवा इतर छोट्या व्यवसायाकरिता कर्ज दिले जाते.
परतफेडीचा कालावधी ५ वर्षे असून नियमित परतफेड केल्यास व्याज आकारले जात नाही, तर थकीत झालेल्या हप्त्यांवर वार्षिक ४% व्याज दर आकारण्यात येते.
कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लक्ष पर्यंत असावे.अर्जदाराचे वय १८ से ५५ वर्ष असावे.

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावे योजना**

गरजू व कुशल व्यक्तींना नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी तसेच व्यावसाय वृद्धीकारिता हि योजना राज्यातील राष्ट्रीयकृत बँकेमार्फत तसेच सहकारी बँकेमार्फत राबविली जाते. व्यवसायाकरिता मागणीनुसार १ ते १० लक्ष पर्यंत बँकेमार्फत देण्यात येते. बँकेचे कर्ज नियमित परतफेड केल्यास महामंडळामार्फत १२% पर्यंत व्याज परतावा, रक्कम अनुदान स्वरुपात लाभार्थीला देण्यात येते. लाभार्थ्यांनी कर्जासाठी ऑनलाइन महामंडळाच्या संकेतस्थळावर अर्ज करावा. कुटुंबाचे वार्षिक वय उत्पन्न ८ लक्ष पर्यंत असावे. अर्जदाराचे वय १८ [illegible] वर्ष असावे.

शैक्षणिक कर्ज व्याज परतावे योजना उच्च शिक्षणाकरिता देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय अभ्याक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता रु. १० ते २० लक्ष इतके महत्तम कर्ज बँकेमार्फत दिले जाते. बँकेचे कर्ज नियमित परतफेड केल्यास महामंडळामार्फत १२% पर्यंत व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरुपात लाभार्थ्याला देण्यात येते. या कर्जासाठी आहेला खालीलप्रमाणे असावी अर्जदार इयत्ता बारावी मध्ये ६०% व अधिक गुणांनी उत्तीर्ण अमावा. अर्जदाराचे वय १७ ते ३० असावे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लक्ष पर्यंत असावे. महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना इतर मागासवर्गीय प्रवगीतील गरीब व होतकरु महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी राज्यातील बचत गटातील उत्पादित केलेल्या वस्तूंचे उत्पादन प्रक्रिया व मूल्य आधारित उद्योगाकरिता बँकेमार्फत मंजूर करण्यात आलेल्या रु. ५ ते १० लक्ष पर्यंतच्या कर्ज रक्कमेवरील १२% व्याज परताचा उपलब्ध करून देण्यात येते. सदर योजना महिला विकास महामंडळाच्या लोकसंचालित साधन केंद्र (उचठउ) चया सहाय्याने राबविण्यात येते. या योजनेचा लाभ घेणारी महिला इतर मागास प्रवर्गातील व महाराष्ट्राची रहिवाशी असावी, त्याचे वय १८ ते ६० वर्ष असावे बचत गटाची नोंदणी महिला विकास महामंडळाच्या लोकसंचालित साधन (उचठउ) केंद्रात केलेली असावी. या योजनाचा लाभ घेण्याकरिता इच्छुकांनी महाराष्ट्र राज्य इतर मागासवगीय वित्त आणि विकास महामंडळ भंडारा याचे कार्यालय डॉ बाबासाहेब आबेडकर सामाजिक न्याय भवन जिल्हा परिषद चौक,भंडारा, संपर्क क्र. ९८८८१७८७७३, ९१५८१८८७३९. ९६५२३१५०८८ तसेच संकेतस्थळ www.mscbcfdc.in येथे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, व्ही.व्ही.फडणवीस यांनी कळविले आहे.

## मुथा अबॅकस अकॅडमीची गरुड झेप आंतरराष्ट्रीय स्तरावर

**सोलापूर । प्रतिनिधी**

दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी पुणे येथे झालेल्या अरिस्टो किड्स अंतर्गत ऑफलाइन आंतराष्ट्रीय अबॅकस व वैदिक रींहि स्पर्धेत एकूण २३ देशासह ३०००+ विद्यार्थ्यांनी विविध लेवल मधून परीक्षेमध्ये सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमासाठी मान्यवर उपस्थित कार्यक्रमाचे प्रास्ताविक मॅनेजिंग डायरेक्टर उज्वल पांडा सरांनी त्यांच्या प्रास्तविकामध्ये अबॅकस वैदिक मॅच आपल्याला उज्वल यश भविष्यामध्ये मिळवण्यासाठी याचा अत्यंत उपयोग होतो व लहान वयात विद्यार्थ्यांचा मेंदूचा विकास जास्तीत जास्त विद्यार्थी अबॅकस चे नॉलेज घेतल्यानंतर त्यांचा मेंदू कॅल्क्युलेटर पेक्षाही गतीने काम करत असताना दिसून येतो याचा उपयोग शालेय अभ्यासात प्रगती होण्यासाठी व प्रत्येक स्पर्धात्मक परीक्षेसाठी कसा होतो त्यांनी उदाहरणाद्वारे सर्वांना पटवून या कार्यक्रमासाठी विविध स्तरातून विविध राज्यातून विद्यार्थी पालकांसहित उपस्थित होते. या स्पर्धेचा निकाल त्याच दिवशी संध्याकाळी पुणे येथे सर्व पालक व शिक्षक समवेत जाहीर झाला. या स्पर्धेत विद्यार्थ्यांना १० मिनिटात अबॅकस साठी ७५ गणिते अचूक सोडविणे अनिवार्य होते. यामधे करमाळा येथील सार्थक वनारसे इंटरनॅशनल रँक तिसरा सार्थक संजय करंडे आंतरराष्ट्रीय रँक फोर्थ , आदित्य अभिजीत दुधे आंतरराष्ट्रीय रँक १ीं, विवान दिनेश मेहेर पलक प्रीतम बलदोटा आंतरराष्ट्रीय सिक्स रँक आंतरराष्ट्रीय रँक सेकंड घेऊन अकॅडमी ची उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली अकॅडमी या स्पर्धेसाठी ५६ विद्यार्थी सहभागी झाले होते. अभिनव पब्लिक स्कूल वाशिंबे या शाळेतूनही विद्यार्थी सहभागी होते.आंतरराष्ट्रीय क्रमांकावर विविध लेव्हल्स मधून विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळवले शरवरी रोहित शिंदे (आंतरराष्ट्रीय सातवा रँक) प्रणील अनिल वैद्य आंतरराष्ट्रीय रँक४९ सुयश दयानंद चौधरी आंतरराष्ट्रीय



रँक१९ श्रावणी रामेश्वर खराडे आंतरराष्ट्रीय रँक ७ आर्यन तात्यासाहेब जाधव आंतरराष्ट्रीय रँक१८ अथर्व गहिनीनाथ बनसोडे आंतरराष्ट्रीय रँक३२ साद बागवान आंतरराष्ट्रीय ५० रिद्धी प्रशांत शिंदे आंतरराष्ट्रीय ५४ प्रतीक जालिंदर सावंत५५ राजवी चिन्मय मोरे५८ आरुष बलभीम बनसोडे १८ आदेश आशिष मेहता१२५ शंभुराजे प्रफुल्ल शिंदे ९३ शिवतेज वर्धमान जाधव७७ ऋषिराज वीरेंद्र लष्कर५२ रिदम भूपेंद्र बोराडे ९ शरयू रघुनाथ फरतडे ११ अन्वी अमोल हिरण५० रियांशी प्रणित कुमार जैस्वाल४५ ईश्वरी भारत मुकणे३० साई सागर काळे५९ यश नरेश शहा२१ स्पंदन बापू घरबुडे १६ आर्यन सामराज कापसे१०२ सहभागी अनुजा भोसले, सानवी राठोड वरील सर्व विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर करमाळ्याचे नाव लौकिक केले आहे . व मुद्दा अबॅकस अकॅडमी ला विक्रमांचा उच्चांक मिळून दिलेला आहे. सर्व विद्यार्थ्यांचे यश कल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश जी करे पाटील व एडवोकेट बाबुराव हिरडे, समाजसेवक श्रेणिकाटेर यांच्याकडून कौतुक करण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांना मुथा अबॅकस अकॅडमीच्या संचालिका ज्योती मुथा यांचे मार्गदर्शन लाभले तसेच स्मिता वनारसे व पूजा शिंदे यांचेही अनमोल मार्गदर्शन लाभले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालयात उत्सव संस्कृतीचा रंग माझ्या पांडुरंगाचा सांस्कृतिक महोत्सव २०२५ साजरा

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

मातोश्री आशाताई कुणावर कला,वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट येथील सांस्कृतिक विभागाद्वारे ' उत्सव संस्कृतीचा रंग माझ्या पांडुरंगाचा सांस्कृतिक महोत्सव २०२५' दिनांक २० जानेवारी ते २२ जानेवारी २०२५ पर्यंत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले . दिनांक २० जानेवारी २०२५ ला प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली,परीक्षक म्हणून डॉ. नितीन अखुज, प्रा सदानंद सार्वे यांनी परीक्षण केले, द्वितीय सत्रामध्ये वाद विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये परीक्षक म्हणून डॉ. मंगला खूने तसेच प्रमोद जयपुरकर यांची उपस्थिती होती. मंगला खुणे यांनी विद्यार्थ्यांना वाद-विवाद स्पर्धेचे नियम समजावून सांगितले व निकाल जाहीर केला. प्रमोद जयपुरकर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा याबद्दल मार्गदर्शन केले. क्रीडा स्पर्धेचे व आनंद मेळाव्याचे सुद्धा आयोजन करण्यात आले यामध्ये धावण्याची स्पर्धा, रस्सीखेच स्पर्धा, लंगडी, सॅक रेस अशा विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, त्यामध्ये विजेत्या गटांना पारितोषिक देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ नयना तुळसकर, सचिव विद्या विकास शिक्षण संस्था,हिंगणघाट यांनी केले.सांस्कृतिक महोत्सवाच्या द्वितीय सत्रामध्ये दिनांक २१ जानेवारी २०२५ ला प्रथम सत्र मध्ये सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले उद्घाटक म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ड.सुधीर कोठारी यांची उपस्थिती होती. प्रा अभिजित डाखोरे यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती दर्शविली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ उमेश तुळसकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. अतिथी म्हणून डॉ. महेंद्र गुंडे प्राचार्य तुळसकर ग्रुप ऑफ फार्मसी हिंगणघाट, प्रा. राकेश साटोणे प्राचार्य तुळसकर इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी हिंगणघाट, नितेश रोडे प्राचार्य विद्या विकास जुनिअर कॉलेज,हिंगणघाट यांची उपस्थिती होती. अँड.सुधीर कोठारी यांनी विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध



शिक्षण हे आवश्यक आहे व शिक्षणाला अनुभवाची जोड असणे ही आवश्यक आहे असे प्रतिपादन केले, प्रा अभिजीत डाखोरे यांनी आधुनिक शिक्षण पद्धती आणि आजची शिक्षण पद्धती यातील फरक समजावून सांगितला. सूत्रसंचालन प्रा.अभय दांडेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ महेंद्र गुंडे यांनी मानले.दिनांक २२ जानेवारी २०२५ ला प्रथम सत्रामध्ये प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांचा सखे साजणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मार्गदर्शक म्हणून सिंधी रेल्वे ,समुद्रपूर ,हिंगणघाट विधानसभा क्षेत्राचे आमदार समीरभाऊ कुणावर, डॉ. जया तुळसकर, संचालिका विद्या विकास शिक्षण संस्था,हिंगणघाट यांची उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून विद्या विकास महाविद्यालय समुद्रपूरचे प्राचार्य डॉ.किशोरचंद्र रेवतकर, डॉ.राजविलास कारमोरे यांची उपस्थिती होती. आमदार समीर कुणावार यांनी विद्यार्थ्यांना आपल्या आई-वडिलांची फसवणूक करू नका असा मोलाचा कानमंत्र दिला. प्रा.ज्ञानेश वाकुडकर यांनी विद्यार्थ्यांना सखे साजणी या कार्यक्रमातून मोलाचे संदेश काव्यमय रुपात दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ.जया तुळसकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ प्राध्यापक अजय बिरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.राकेश साटोणे यांनी केले. द्वितीय सत्रामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले या कार्यक्रमांमध्ये विविध नाटिका, नृत्य, फॅशन शो आयोजित करण्यात आल्या. त्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना प्रकट करण्याची संधी महाविद्यालयातर्फे देण्यात आली. २१ जानेवारी व २२ जानेवारी या आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निखुजा जोशी व मृणमई डफ या विद्यार्थिनींनी अतिशय सुंदर पद्धतीने केले. तर आभार प्रदर्शन सांस्कृतिक विभाग प्रमुख संगीता लांडगे यांनी मानले.

### राज्यभरातील आदिवासी कलाकार, चित्रकार,नृत्य पथकांनी आवेदन करावे

# राज्यस्तरीय आदीवासी प्रदर्शनात घेता येणार सहभाग परंपरेचा गौरव, संस्कृतीचा उत्सव: नागपूरमध्ये आदिवासी महोत्सव

**भंडारा । प्रतिनिधी**

केंद्रशासनाने आदिवासी स्वातंत्र्य सौनिकांना सन्मानित करणे आणि स्वातंत्र लढातील त्यांचे योगदान, सांस्कृतिक वारसा यांचे स्मरण करुन आदिवासी बांधवांना आर्थीक व सामाजिक विकासाकरीता ऊर्जा देण्यासाठी दिनांक १५ नोव्हेंबर हा भगवान बिरसा मुंडा पांचा जन्मदिवस जनजाती गौरव दिन म्हणून घोषित केला आहे, जनजातीय गौरव वर्षाच्या निमित्याने यावर्षी दिनांक १५ नोव्हेंबर २०२४ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध उपक्रम, कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत केंद्रशासनाने कळविले आहे.

त्यानुसार आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत वर्षभरातील विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने





राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सव दिनांक १५ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२५ रोजी नागपुर येथे योजण्याचे प्रस्तावित आहे, कार्यक्रमात राज्यस्तरीय आदिवासी पारंपारीक नृत्य स्पर्धा, राज्यस्तरीय आदिवासी पारंपारीक हस्तकला प्रदर्शन व विक्री, आदिवासीच्या जिवनावर आधारित लघुपट माहितीपट महोत्सव, आदिवासी पारंपारीक खाय महोत्सव व आदिवासी पारंपारीक गीते व खाद्य सादरीकरण अशी कार्यक्रमाची रुपरेखा प्रस्तावित आहे. तरी सदर कार्यक्रमात भाग घेवु ईच्छीणा-या भंडारा जिल्हातील ईच्छुक आदिवासी हस्तकलाकार, चित्रकार, गृहउद्योग, आदिवासी पारंपारीक नृत्य पथक, समुह बचत गट, उद्योजक/ उत्पादक यांनी त्यांचे अर्ज ०५.०२.२०२५ पर्यंत कार्यालय प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भंडारा यांचे कडे सादर करावे, यापत्रासोबत बँक पास बुक, आधार कार्ड, जातीचा दाखला इत्यादीची छायांकित प्रत सादर करावी, सहभागी कलावंताना जाणे येणे प्रवास भत्ता व दैनिक भत्ता हा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांचे मार्फत दिला जाईल. तरी जास्तीत जास्त आदिवासी कलाकार उद्योजक/उत्पादक, नृत्य पथक, बचत गट यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन नीरज मोरे प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प भंडारा विभागानी कळविले आहे.

# साईनाथ कबाडे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**वैजापूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुद्देश वाडगाव (ता. गंगापूर) येथे पदवीधर प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या साईनाथ चतुर कबाडे यांना शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. ९ फेब्रुवारी रोजी हा सन्मान त्यांना प्रदान केला जाणार आहे. कबाडे यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. कानबा वाडी शाळेतील अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी शासकीय सेवेत रुजू होण्यासाठी मार्गदर्शन केले असून, त्यांच्या विद्यार्थ्यांनी पोलीस, सैन्य, आरोग्य आणि कृषी क्षेत्रांत यश मिळवले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे काही विद्यार्थी विद्यानिकेतन परीक्षेत पात्र ठरले आहेत.शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांना शेतीचीही विशेष आवड आहे.विद्यार्थ्यांच्या पालकांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन करण्यासाठी ते थेट त्यांच्या शेतात जाऊन सल्ला देतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतींचा लाभ मिळाला आहे.

शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी जिल्हा



परिषद शाळा, शिंगी येथे समाजाच्या सहभागातून स्टेज बांधकाम पूर्ण केले आहे. तसेच, त्यांनी आपल्या शाळेसाठी आयएसओ मानांकन मिळवून दिले आहे.

विद्यार्थी सेवा हीच परमेश्वर सेवा या ध्येयाने कार्यरत असलेल्या कबाडे यांच्या या बहुआयामी योगदानाची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

# वरोऱ्यात रंगणार खासदार चषक अखिल भारतीय व्हॉलीबॉल स्पर्धा

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन (WSF) व लोक शिक्षण संस्था वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय खासदार बाळूभाऊ धानोरकर स्मृती प्रित्यर्थ अखिल भारतीय खासदार चषक पुरुष व महिला व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन १८ ते २० फेब्रुवारी २०२५ दरम्यान लोकमान्य महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले आहे.

स्पर्धेकरिता विद्युत प्रकाश झोतातील दोन मैदाने तयार करण्यात आली असून, खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या पुढाकाराने होणाऱ्या या स्पर्धेमध्ये आकर्षक बक्षिसांची रचना करण्यात आली आहे. पुरुष गट मध्ये, प्रथम पुरस्कार १ लाख रुपये रोख आणि चषक, द्वितीय पुरस्कार ७५ हजार रुपये रोख आणि चषक, तृतीय पुरस्कार ५० हजार रुपये रोख आणि चषक, आणि चतुर्थ पुरस्कार २५ हजार रुपये रोख आणि चषक दिले जातील.महिला विभागात प्रथम पुरस्कार ७५ हजार रुपये रोख आणि चषक, द्वितीय पुरस्कार ५० हजार रुपये रोख आणि चषक, तृतीय पुरस्कार २५ हजार रुपये रोख आणि चषक, आणि चतुर्थ पुरस्कार १५ हजार रुपये रोख आणि चषक दिले जातील. याशिवाय इतर वैयक्तिक रोख बक्षिसे देखील देण्यात येणार आहेत. या स्पर्धेत बंगाल, ओरिसा, तेलंगाना, तामिळनाडू, केरळ, मध्य प्रदेश, पंजाब, गुजरात आणि महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी सुसज्ज असलेल्या नामांकित पुरुष व महिला संघांची भागीदारी होईल.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी लोक शिक्षण संस्था वरोडाचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत पाटील , आयोजन समितीचे अध्यक्ष मानस बाळूभाऊ धानोरकर, व वरोरा स्पोर्ट्स फाऊंडेशन वरोरा चे अध्यक्ष गजानन जीवतोडे यांच्यानेतृत्वात आयोजन समितीचे सदस्य, कार्यकर्ते व खेळाडू अहोरात्र परिश्रम घेत आहेत.





**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'महा आवास' या ग्राम विकास आणि पंचायतराज विभागाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन**

# गड कायम देशमुख कुटुंबाच्या पाठीशी-महंत नामदेव शास्त्री!

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

-मी कधीही कोणत्याच आरोपीची पाठराखण केलेली नाही, करणार देखील नाही, उलटपक्षी भगवानगड देशमुख कुटुंबाच्या पाठीशी कायम राहील. आरोपीना फाशी व्हावी हीच आपली भूमिका आहे असे मत भगवानगडाचे महंत नामदेव शात्री यांनी व्यक्त केले. संतोष देशमुख कुटुंबाने रविवारी शास्त्री यांची भेट घेतली.नामदेव शास्त्री यांनी दोन दिवसापूर्वी धनंजय मुंडे यांच्या पाठीशी गड असल्याचे म्हटले हॉटेल. त्यानंतर महाराष्ट्रात खळबळ उडाली.

दरम्यान आपली बाजू समजावून सांगण्यासाठी आज देशमुख कुटुंबिय गडावर पोहचले. त्यांनी महंतांची भेट घेतली. त्यांनी संतोष देशमुख यांच्या खूनामागील खरं कारण, आरोपींचा पूर्व इतिहास, त्यांची गुंडगिरी, खंडणीचे प्रकार, त्यांच्यावरील गुन्ह्यांचा कच्चाचिठ्ठाचा महाराजांपुढे मांडला. आरोपींच्या गुन्ह्याचा पाढा वाचून संतोष देशमुख यांचे काय चुकले असा प्रश्न केला. धनंजय देशमुख यांच्या आर्त हाक नामदेव शास्त्री यांनी ऐकली. त्यांनी लागलीच भगवानगड हा देशमुख कुटुंबियांच्या पाठीशी असल्याचे जाहीर केले.यावेळी देशमुख कुटुंबाने कधीच जातीवाद केला नाही, असे धनंजय देशमुख यांनी सांगितले. देशमुख कुटुंबियांची जमीन मुंडे कुटुंब दोन पिढ्यांपासून कसत आहे, त्याची माहिती



त्यांनी महंतांना दिली. प्रामाणिकपणे सांगतो. मनोहर मुंडेंचे चार मुले होते. दोन मुले पुण्यता होते. दोन मुले इथे. त्यांनी जे पिकवलं ते आम्ही खातो. देशमुख कुटुंबाने जातीवाद केला असता तर त्याच्या हत्येनंतर दिसलं असतं. दलित बांधावाला वाचवण्यासाठी गेला. असे धनंजय देशमुख म्हणाले.

आमची कोणतीही गुन्हेगारी नाही. १५ वर्ष सरपंच राहिलेल्या माणसाशी या लोकांनी संपर्क साधायला हवा होता. आरोपींवर आतापर्यंत अनेक गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आरोपींची मानसिकता तपासण्याची गरज आहे. ज्याला आरोपींची बाजू घ्यायची त्यालाच जातीयवादाचा अंश येत आहे. आम्ही सर्व दाखवलं आहे. यांच्या कार्यालयात बसायचे. त्यांच्या गाडीत फिरायचे, असे देशमुख म्हणाले.हा न्यायाचा लढा आहे. अतिशय क्रूर हत्या झाली आहे. प्रत्येक क्षेत्रातील लोक आपल्यासोबत आहे. राजकीय नेते, संप्रदायाचे लोक आहेत, सामाजिक कार्यकर्ते आहेत, ते आमच्यासोबत आहेत. न्यायाच्या भूमिकेत आहेत. अशावेळी लोकप्रतिनिधींना जातीयवादी म्हणू नका. नाही तर ते कोणत्याच न्यायाच्या भूमिकेत येणार नाही. न्याय मागणाऱ्या लोकप्रतिनिधींना चुकीचं ठरवू नका, अशी विनंती धनंजय देशमुख यांनी केली.भगवान बाबाला मानणारं कुटुंब आहे. जातीय सलोखा या गावात होतं. यापूर्वी किती वेळा गडावर आले हे त्यांनी दाखवलं. भगवान गड तुमच्या पाठी कायम राहील ही ग्वाही देतो, असे वक्तव्य नामदेव महाराजांनी केले. भगवान गडाला मानणारं कुटुंब आहे. यापूर्वी ते गडावर येत होते. आरोपींची पार्श्वभूमी असलेले पुरावे त्यांनी दिले आहेत. धनंजय यांचं म्हणणं आहे की, याला जातीयवादाचं स्वरुप देऊ नका,. भगवान गड कायम स्वरुपी देशमुख कुटुंबाच्या पाठी उभं राहील. आरोपींची खरी पार्श्वभूमी काय आहे, त्यांच्यावर गुन्हे किती आहे, ते त्यांनी दाखवलं.संतोष अण्णाने किती काम केलं हे त्यांनी दाखवलं. ते मूळचे बाबाचे आहेत. हे आज कळालं. त्यांची जमीन तीन पिढ्यांपासून वंजारी कुटुंब करत आहे. जातीयवाद न करता खऱ्या आरोपीला शिक्षा व्हावी हे गादीवरून सांगणं आहे. आम्ही बसून बोलू. त्यांना दोन घास खाऊ घालू. त्यांना प्रसाद देऊ. संतोष देशमुख यांच्या आत्म्याला शांती मिळेल, असेमहंतम्हणाले

# बोगस आयटीआय ची मान्यता रद्द करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी; ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनची मागणी

**भंडारा । प्रतिनिधी**

सेवकराम पारधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हरदोली(सि.) व सीमा देवी पारधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तुमसर या बोगस औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची मान्यता रद्द करण्यात यावी यासाठी ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन च्या वतीने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

तुमसर तालुक्यातील सेवकराम पारधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हरदोली(सि.) व सीमादेवी पारधी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तुमसर या दोन्ही संस्था शासनाच्या कोणत्याही निकषाचे पालन न करता आपल्या मनमर्जीप्रमाणे चालत असून सदर संस्था पूर्णपणे बोगस असून सदर दोन्ही संस्थांनी प्रशिक्षणार्थींना झीरो अटेंडन्टस् तत्वावर प्रवेश दिला असून अनेक प्रशिक्षणार्थी संस्थेत येत नाहीत ते दुसरीकडे नोकरी करतात किंवा इतर काम करतात. सदर संस्थांमध्ये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य(उ्रूएढ) व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (छउतढ) च्या मार्गदर्शक तत्वानुसार कोणत्याही प्रकारच्या भौतिक सुविधा (सुसज्ज इमारत व प्रयोगशाळा,अद्यावत ग्रंथालय,शौचालय, पिण्याचे शुद्ध पाणी, इत्यादी.) नाहीत. तसेच पात्र शिल्पनीदेशक सुध्दा नाहीत व जे आहेत ते पात्र नाही व पुरेसे सुध्दा नाहीत. सदर संस्था फक्त प्रशिक्षणार्थींची लूट करून प्रमाणपत्र वाटपाचे केंद्र बनले आहेत. ज्या संस्थांमध्ये प्रशिक्षणार्थीच येत नसतील व भौतिक सुविधांचा अभाव असेल त्या संस्थेमध्ये चांगले प्रशिक्षित प्रशिक्षणार्थी घडू शकतील का..? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. इथून बाहेर पडलेले कौशल्य नसलेले



प्रशिक्षणार्थी देशाच्या विकासासाठी घातक ठरतील. त्यांचा देशाच्या विकासाठी हातभार लागणार नाही व अप्रशिक्षित प्रशिक्षणार्थींचा कामाच्या ठिकाणी अपघात झाला तर याला जबाबदार कोण राहील असा प्रश्न यावेळी ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन च्या शिष्टमंडळाने उपस्थित केला. सदर प्रकार अतिशय संतापजनक व गंभीर असून यासाठी या संस्थांपेक्षा प्रशासन जास्त दोषी आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणा व दुर्लक्षामुळे तसेच भ्रष्टाचारामुळे अशा संस्थांना जास्त बळ मिळत आहे. असा आरोप करीत ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन ने सदर बोगस संस्थांची मान्यता रद्द करून संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर शासनाच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.वरील मागण्या येत्या एका आठवड्यात पूर्ण झाल्या नाहीत तर शासन-प्रशासनाविरुद्ध आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन, भंडारा च्या वतीने जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना निवेदनातून देण्यात आला. यावेळी शिष्टमंडळात ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन चे महाराष्ट्र राज्याध्यक्ष कॉम्रेड वैभव चोपकर यांच्या मार्गदर्शनाखाली व कॉ.रवी बावणे, जिल्हाध्यक्ष भंडारा यांच्या नेतृत्वामध्ये कॉ.विश्वजीत बनकर,जिल्हा सचिव, कॉ.सागर कारेमोरे, कॉ. राकेश बडोले,कॉ. निशिका उरकुडे, कॉ.हर्षा बंसोड यांच्यासह अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

# गझल ही जीवन कसे जगावे हे शिकवते ज्येष्ठ गझलकार डॉ.गणेश गायकवाड



दुसरे अ. भा. एल्गार मराठी गझल संमेलन अंबाजोगाई – समरोप समारंभात,व्यासपीठावर डावीकडून डॉ. शुभदा लोहिया, स्वागताध्यक्ष दगडू लोमटे, मुख्य अतिथी डॉ. गणेश गायकवाड, संमेलनाध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे, अतिथी राजेसाहेब देशमुख, गोरख शेंद्रे, सुनील जाधव

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

गझल ही जीवन कसे जगावे हे शिकवते असे मत ज्येष्ठ उर्दू व मराठी गझलकार डॉ. गणेश गायकवाड यांनी दोन दिवसीय अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलनाचा समारोप करताना व्यक्त केले.आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या समारोपीय सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे माजी सभापती राजेसाहेब देशमुख तर अध्यक्ष म्हणून संमेलनाचे अध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे हे उपस्थित होते. व्यासपीठावर स्वागताध्यक्ष दगडू लोमटे, डॉ. शुभदा लोहिया, गोरख शेंद्रे, सुनील जाधव हे उपस्थित होते. आपल्या विस्तारीत भाषणात डॉ. गणेश गायकवाड यांनी मराठी उर्दू गझलांचे संदर्भ देत महाराष्ट्रात गझल ही कशी समृध्द होत गेली ते सांगितले. गझलेची सुरुवात ही उर्दू भाषेत झालेली असली तरी आता मराठी गझल ही खुप आशयघन झाली असून उर्दू गझलापेक्षाही ती खुप पुढे गेली असल्याचे सांगितले. गझल लेखन करण्यापुर्वी गझलकारांनी जुन्या उर्दू आणि मराठी गझलकारांनी लिहिलेल्या गझलांचा अभ्यास करणे हे खुप आवश्यक असल्याचे सांगत गझलेला आशयघन आणि समृध्द बनवण्यासाठी गझलेतील प्रत्त्येक शेर हा ताकदवान झाला पाहिजे असे त्यांनी सांगितले. आपल्या भाषणात डॉ. गणेश गायकवाड यांनी आपला मराठी आणि उर्दू गझलांचा प्रवास कसा सुखकर झाला, उर्दू गझला लिहिण्यापुर्वी आपण उर्दू भाषा कशी आत्मसात केली हे सांगत त्यांनी आपल्या अनेक मराठी आणि उर्दू गझला पेश केल्या. महाराष्ट्रात सुरु झालेला मराठी आणि उर्दू गझलांचा हा एल्गार अधिक सशक्त करण्यासाठी हे दुसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलन अत्यंत प्रभावी आणि आशादायी ठरणार असून या संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबध्दल त्यांनी साधना सेवाभावी संस्थेचे सचिव दगडू लोमटे आणि त्यांच्या सर्व सहका-यांचे मनापासून कौतुक केले. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना राजेसाहेब देशमुख यांनी साधना सेवाभावी संस्थेचे वतीने अंबाजोगाई शहरात गझलांचा हा दोन दिवसीय दरबार अंबाजोगाईत घेतल्याबद्दल संयोजक दगडू लोमटे यांचे कौतुक करुन गझलेचे सामान्य माणसाच्या आयुष्यात किती महत्त्व आहे हे अनेक उदाहरणे देत सांगितले. यापुढे गझलेल्या कोणत्याही कार्यक्रमाला आपण मनापासून सहकार्य करु असे सांगितले. या संमेलनाचा अध्यक्षीय समारोप करतांना संमेलनाध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी हे गझल संमेलन अतिशय देखणे, दृष्टलागण्याजागे झाले असे सांगत या संमेलनात आयोजित करण्यात आलेली १७ ही मुशायरे सत्रे ही अत्यंत दर्जेदार आणि प्रवाही झाली असल्याचे सांगितले. या १७ ही मुशायरे सत्रांना दगडू लोमटे यांनी आपल्या कल्पकतेने महाराष्ट्रातील दिवंगत गझलकारांची नांवे दिली याबद्दल समाधान व्यक्त केले. संमेलनाच्या उद्घाटनीय कार्यक्रम सत्रात आपण सविस्तर बोललो असल्यामुळे समारोपीय कार्यक्रमात आपण जास्त बोलणार नाहीत असं सांगत त्यांनी या संमेलनाच्या उत्कृष्ट आयोजनाबध्दल दगडू दादा लोमटे यांचे कौतुक केले.

**१७ मुशायरांना उत्तम प्रतिसाद**

या दोनदिवसीय गझल संमेलनात एकुण १७ मुशयरांचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील दिवंगत मराठी आणि उर्दू गझलकारांच्या स्मृती जागवत त्यांची नावे या मुशायरांना देण्यात आली होती. या १७ मुशायरांपैकी पहिल्या दिवशी सतीष दराडे, राम मुकद्दम, कमलाकर आबा देसले, मनोहर रणपीसे, अरुणोदय भाटकर, ग्वाही जमादार, अनिल कांबळे, मधुसूदन नानिवडेकर, आणि बशर नवाज तर संमेलनाच्या दुसरे दिवशी २ फेब्रुवारी रोजी प्रकाश मोरे, व्यंकटेश देशमुख, विनीता कुलकर्णी, नाना बेनगुडे, सुप्रिया जाधव, उ. रा. गिरी, लक्ष्मण जेवरे, गिरीश खारकर, बदिउज्जमा खावर यांच्या नावाने ही १७ मुशायरे आयोजित करण्यात आली होती. या १७ मुशायरामध्ये जवळपास २०० गझलकारांनी सहभाग घेत आपली गझल सादर केली.

**मान्यवरांची सतत उपस्थिती**

या गझल संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे या संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक गझलकार डॉ. दिलीप पांढरपट्टे, प्रमुख अतिथी ज्येष्ठ उर्दू मराठी गझलकार डॉ. संदीप गुप्ता, पुरस्कार मुर्ती गझलगंधर्व सुधाकर कदम यांच्या सह महाराष्ट्रातील मान्यवर गझलकारांनी या १७ ही मुशायरांना आपली उपस्थिती दर्शवत उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदविला.

**तिसरे संमेलन अमरावती ला!**

दुसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलन समारोपापुर्वीच तिसरे संमेलन कोठे घ्यावे या बाबत संयोजन समितीने चर्चा केली. यावेळी संयोजन समितीकडे अमरावती, गोवा आणि बुलढाणा या तीन शहारातील गझलकारांनी आपल्या कडे प्रस्ताव सादर केला. यापैकी तिसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलन घेण्याचा मान अमरावती लाख दिला असल्याचे संयोजक दगडू लोमटे यांनी जाहीर केले.

**शहर गझलमय झाले!**

अंबाजोगाई शहरात आयोजित करण्यात आलेल्या दोनदिवसीय अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलनाच्या आयोजनामुळे संपुर्ण शहर गझलमय झाल्यागत जाणवत होते. या संमेलनात आयोजित करण्यात आलेल्या १७ गझल मुशायरांना अंबाजोगाई शहरातील गझल रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. या समारोपीय कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कवयत्री तिलोत्तमा पतकराव यांनी केले.

# पृथ्वीराज मोहोळ महाराष्ट्र केसरी किताबाचा मानकरी;उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते मानाची गदा प्रदान

## राज्याच्या क्रीडा विकासासाठी शासन कटिबद्ध–उपमुख्यमंत्री अजित पवार





**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या ६७ व्या राज्यस्तरीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरी किताबासाठी झालेल्या लढतीत पुण्याच्या पृथ्वीराज मोहोळने सोलापूरच्या महेंद्र गायकवाडचा पराभव करीत विजतेपद पटकाविले. स्पर्धेचा विजेता पृथ्वीराज मोहोळ याला उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या हस्ते मानाची गदा प्रदान करण्यात आली. राज्यातील क्रीडा विकासाला चालना देतांना प्रत्येक खेळासाठी आवश्यक आर्थिक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही श्री.पवार यांनी दिली.मॅट विभागात नांदेडचा (मूळचा पुण्याच्या राजगुरुनगरमधील राक्षेवाडीचा) डबल महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे आणि पुणे जिल्ह्याचा पृथ्वीराज मोहोळ यांच्यात लढत झाली. यात पृथ्वीराज मोहोळ विजेता ठरला. माती विभागातून सोलापूर जिल्ह्याचा महेंद्र गायकवाड आणि परभणीचा साकेत यादव यांच्यात अंतिम लढत झाली. यात महेंद्र गायकवाड विजेता ठरला.

अहिल्यानगर येथील वाडिया पार्कमध्ये कै.बलभिम अण्णा जगताप क्रीडानगरीत झालेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, आमदार संग्राम जगताप, माऊली खटके, काशिनाथ दाते, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै.रामदास तडस, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आदी उपस्थित होते.

स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन करून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, राज्यातील क्रीडा रसिकांनी या स्पर्धेला चांगला प्रतिसाद दिला. स्पर्धेसाठी पारितोषिकेही मोठी ठेवण्यात आली आहेत. गेले पाच दिवस स्पर्धेच्या भव्य आयोजनाचा आनंद राज्याच्या जनतेला घेता आला. यापुढेदेखील या स्पर्धेचे आयोजन करतांना या स्पर्धेचे दिमाखदार आयोजनाचे आव्हान आयोजकांसमोर असेल. खेळांना प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य शासनदेखील प्रयत्नशील आहे. प्रत्येक खेळाच्या विकासासाठी राज्य शासन सहकार्य करेल आणि अहिल्यानगरच्या क्रीडा विकासासाठीदेखील आवश्यक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. अहिल्यानगरमध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे भव्य आयोजन झाल्याचे नमूद करून केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ म्हणाले, ही मानाची स्पर्धा आहे. स्व.मामासाहेब मोहोळ यांनी या स्पर्धेला सुरूवात केली. त्यानंतर राज्यात कुस्तीच्या वैभवात भर पडून ही परंपरा आणखी पुढे जात आहे. महाराष्ट्र कुस्तीची पंढरी आहे. राज्याने देशाला अनेक मल्ल दिले. महाराष्ट्राच्या तीन मल्लांना शासनाने वर्ग एक दर्जाच्या पदावर नियुक्ती दिली आहे. येत्या काळातही कुस्तीला राजाश्रय मिळेल असा विश्वास व्यक्त करून राज्याची ही परंपरा अधिक समृद्ध करण्यासाठी सर्वजण प्रयत्न करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कुस्ती खेळाला डोपींगसारख्या प्रकाराने गालबोट लागू नये यासाठी येत्या काळात अधिक प्रयत्न होतील असे त्यांनी सांगितले. विधान परिषदेचे सभापती प्रा.शिंदे यांनी जिल्ह्यात महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल राज्य शासन आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाला धन्यवाद दिले. कुस्तीप्रेमी जनता चांगल्या खेळालाच प्रोत्साहन देते असे सांगून त्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, महाराष्ट्र केसरी स्पर्धा अहिल्यानगर वासियांसाठी मोठी पर्वणी आहे. वाडिया पार्कचे मोठ्या स्टेडिअममध्ये रुपांतर करायचे आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या क्रीडा विकासाला चालना मिळेल असे सांगून त्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या उत्तम आयोजनाबद्दल संयोजकांचे अभिनंदन करून क्रीडा मंत्री भरणे म्हणाले, २००५ मध्ये अहिल्यानगरमध्ये 'हिंद केसरी' स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. राज्याला कुस्तीची गौरवशाली परंपरा आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्याने मल्ल दिले आहेत. अहिल्यानगरच्या क्रीडा विकासासाठी शासनाकडून आवश्यक सर्व सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.प्रास्ताविकात आमदार जगताप यांनी कुस्ती स्पर्धेविषयी माहिती दिली. लाल मातीच्या खेळातून संस्कार होत असल्याने राज्यभरात या खेळाचे संवर्धन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या कुस्ती स्पर्धेमुळे अहिल्यानगरचे नाव प्राधान्याने घेतले जाईल असे ते म्हणाले.माजी आमदार अरुणकाका जगताप, पद्मश्री पोपटराव पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, माजी खासदार सुजय विखे पाटील, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, सरचिटणीस हिंदकेसरी पै. योगेश दोडके, चित्रपट दिग्दर्शक प्रविण तरडे, जिल्हा कुस्तीगीर कार्याध्यक्ष संघाचे संतोष भुजबळ आदी उपस्थित होते.

# जनतेच्या समस्या सुटण्यासाठी अधिकाऱ्यांनी गांभीर्य ठेवावे-विवेक कोल्हे




**कोपरगाव । प्रशांत टेके**

कोपरगाव तहसील कार्यालय येथे कोपरगाव मतदारसंघातील विविध समस्या घेऊन त्यांचे निराकरण होण्यासाठी सहकार महर्षी कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेक कोल्हे हे प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी नागरिकांसह बैठक घेत असतात. आचार संहिता काळामुळे गेले काही महिने ही बैठक होऊ शकली नव्हती ती सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी पार पडली.यावेळी तालुक्यातील शेकडो शेतकरी,नागरिक,सरपंच,विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तहसीलदार महेश सावंत यांच्या दालनात वीज,पाणी,घरकुल,महसूल,रस्ते, चाऱ्या,ग्रामविकासाच्या योजना, गायगोठे आदींसह विविध विषयावर नागरिकांनी विवेक कोल्हे यांच्या उपस्थितीत समस्या मांडल्या.पात्र असून घरकुल मिळत नाही म्हणून आवाज उठवणाऱ्या वयोवृद्ध महिला, ग्रामपंचायत स्तरावरील योजनांना मंजुरी आणि निधी वेळेवर मिळत नाही यासाठी आग्रही झालेले सरपंच,विजेच्या समस्यांनी बेहाल होणारे शेतकरी यांची व्यथा विवेक कोल्हे यांनी यावेळी प्रशासनाला निदर्शनास आणून दिली. अक्षरशः जर प्रश्न सुटले नाही तर आम्हाला आत्मदहन करावे लागेल अशी भूमिका असणाऱ्या नागरिकांना याच बैठकीत समाधान कारक उत्तरे घेत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करण्यासाठी कोल्हे यांनी आग्रह धरला.

विविध कारणे देऊन नेहमी अनेक समस्यांना फाटा देणाऱ्या पंचायत समिती गट विकास अधिकारी यांना कोल्हे यांनी खडेबोल सुनावले. अतिशय बेजबाबदार पने गट विकास अधिकारी यांचं वर्तन असून परिणामी अनेक नागरिकांच्या सुटत नाही.यासह त्यांच्या कारभारात पारदर्शकता नाही अशी चर्चा ग्रामीण भागातील नागरिकांनी केली. जर हा कारभार सुधारला नाही तर सर्व गावातून जनता उद्रेक करेल आणि पर्यायाने अशा अधिकाऱ्यांचे कारनामे वरिष्ठ स्तरावर मांडू अशी चेतावणी देताच संबंधित विभागात एकच धांदल उडाली. जर पात्र लाभार्थ्यांना वंचित ठेवले जात असेल आणि कामे पूर्ण करण्यासाठी काही वेगळी मागणी केली जात असेल तर ही बाब खपवून घेतली जाणार नाही याचे भान त्यांनी ठेवावे असा सज्जड इशाराच कोल्हे यांनी दिला त्यामुळे उपस्थिती नागरिकांना आपल्या समस्या लवकरच मार्गी लागतील अशी आशा या निमित्ताने चेहऱ्यावर दिसून आली.गायगोठा प्रकरणी पुन्हा गदारोळ झाला असून कुणाच्या विशिष्ट सूचना असले तीच प्रकरणे घेण्यात येऊ नये. नियमांनुसार पात्र लाभार्थी यादी आम्हाला द्या दूध का दूध पाणी का पाणी होईल व योग्य गावांना न्याय मिळेल.एकच घरात दोनदा लाभ देणारे कोण आणि घेणारे कोण हे शेतकरी अद्याप विसरले नाहीत याचा अभ्यास करून कुणावर अन्याय करू नका असेही कोल्हे म्हणाले.

वीज वितरण,सार्वजनिक बांधकाम,महसूल,पंचायत समिती,वन विभाग असे विविध विभागांचे अधिकारी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.कोपरगाव पंचायत समिती गट विकास अधिकारी यांच्या कारभाराने नागरिक संतप्त झाले असून विवेक कोल्हे यांनी या विषयावर प्रकाश टाकल्याने सर्वांनी समाधान व्यक्त केले आहे. टेबलाखालचा कारभारात तेजीत असून त्यांना जनतेचे गांभीर्य नाही असा थेट आरोपच अनेक नागरिकांनी यावेळी केल्याने सर्वत्र चर्चेला उधाण आले आहे.